# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## अर्थसंकल्पीय अंदाज
## २०२६-२७



**मुंबई महानगर प्रदेशात पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण व समतोल विकासास कटिबद्ध ....**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

सत्यमेव जयते



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

# शुभेच्छा!

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा अर्थसंकल्प सादर होत असताना मला अतिशय आनंद होत आहे. 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेच्या ध्येय पूर्तीसाठी मुंबई महानगर प्रदेशातील अटल सेतू-पारबंदर प्रकल्प, मेट्रो मार्गिका २ ब, ७, 'मुंबई वन' ॲप अशा विकास योजना यशस्वीपणे पूर्ण केल्याचे मला समाधान आहे.

देशाच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या संकल्पात महाराष्ट्र ही एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करण्यासाठी अनेक उपाय करण्यात येत आहेत. त्यात महानगर क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असणार आहे. नुकतेच आपण दावोस येथे अनेक सामंजस्य करार केले. त्यातील एक करार रायगड-पेण ग्रोथ सेंटरचा सुद्धा आहे. हे असेल किंवा वाढवण बंदर, एकूणच तिसरी आणि चौथी मुंबई आकारास येण्याच्या दृष्टीने आता पाऊले पडण्यास सुरुवात झाली आहे. अनेक नवनवे प्रकल्प आकार घेत आहेत. अर्थातच यात एमएमआरडीएचेही योगदान मोठे आहे.

मुंबईच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी हाती घेतलेल्या ७० कि.मी. लांबीच्या भुयारी योजना, जवळपास ३३७ कि.मी. मेट्रो मार्गिकांचे जाळे, विविध पायाभूत प्रकल्प यामुळे मुंबईत एका टोकापासून ते दुस-या टोकापर्यंतचा प्रवास ५९ मिनिटात पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

शाश्वत विकास साधण्यासाठी हाती घेतलेल्या पाणीपुरवठा योजना, पर्यावरणानुकूल पायाभूत सुविधांचा विस्तार, एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन व सर्क्युलर इकॉनॉमी यासारखे उपाय अधिक शाश्वततेकडे घेऊन जाणारे आहेत. मी याप्रसंगी महानगर आयुक्त, त्यांचे सर्व सहकारी अधिकारी व कर्मचारी यांचे मनापासून अभिनंदन करतो व त्यांच्या अर्थसंकल्पीत योजना यशस्वीपणे कार्यान्वित व्हाव्यात, यासाठी अनेकानेक शुभेच्छा देतो.

धन्यवाद!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in



एकनाथ संभाजी शिंदे
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

# शुभेच्छा

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा अर्थसंकल्प सादर होत आहे, ही आनंदाची बाब आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार, आधुनिक आणि भक्कम पायाभूत सुविधा उभारण्यात प्राधिकरणाचा मोलाचा वाटा असून, खऱ्या अर्थाने एमएमआरडीए हे इन्फ्रास्ट्रक्चर पॉवर हाऊस म्हणून प्रभावीपणे काम करते आहे, याचा मला अभिमान वाटतो. मुंबई या देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या महानगरातही एमएमआरडीए च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत, त्यामुळे या महानगराचा चेहरा मोहराही बदलत चालला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य व प्रेरणादायी स्मारक आगामी वर्षात लोकार्पण करण्याचा आपला दृढ संकल्प आहे. हे स्मारक सामाजिक समतेचा आणि संविधानिक मूल्यांचा जागर करणारे ऐतिहासिक केंद्र ठरेल, असा मला विश्वास आहे.

तसेच, स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्मारकाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण करून, दुसऱ्या टप्प्याचे कामही लवकरच मार्गी लावले जात आहे, ही बाब निश्चितच समाधानकारक आहे.

घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगर परिसरातील सुमारे१७०००पात्र लाभार्थींना झोपडपट्टी सुधारणा योजनेत नवीन, सुरक्षित व सुसज्ज इमारतींमध्ये घरे देण्यासाठी बांधकामाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला आहे.

महानगर प्रदेशात विविध मेट्रो मार्गिकांचा विस्तार, भुयारी मार्गांचे जाळे आणि आधुनिक वाहतूक प्रकल्पांमुळे नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सुकर, जलद आणि आरामदायी होत आहे. यामुळे आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासालाही चालना मिळत आहे.

आगामी अर्थसंकल्पात हाती घेतलेल्या सर्व योजना यशस्वीपणे प्रत्यक्षात येऊन मुंबई महानगर प्रदेश सुजलाम, सुफलाम आणि समृद्ध व्हावा, अशी मी मन:पूर्वक सदिच्छा व्यक्त करतो. या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, याची मला खात्री आहे. या कार्यात योगदान देणाऱ्या महानगर आयुक्तांसह सर्व अधिकारी, कर्मचारी व सहकाऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन व आभार मानतो.

(एकनाथ संभाजी शिंदे)

**कार्यालय** : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, **दूरध्वनी** : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in

जा/अवि व औ ,वैशि ,सान्या ,परि ,नवि.म.रा.क्र.व्ही.आय.पी./७६२ /२०२६, दि.१२.०२.२०२६




**राज्यमंत्री**

**नगरविकास,परिवहन,सामाजिक न्याय,**
**वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास**
**व औकाफ**

महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
Email: madhuri-misal@gmail.com


**दिनांक :** १२.०२.२०२६

## शुभेच्छा संदेश

मुंबई महानगर प्रदेश हे राज्याचे ग्रोथ इंजिन आहे, त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा अर्थसंकल्प सादर होत असताना मला अतिशय आनंद होत आहे.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, गृहनिर्माण आणि डिजिटल सेवा या क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत असलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्याच्या प्रगतीला नवी गती देत आहेत.

मुंबई महानगर प्रदेशासह संपूर्ण राज्यात रस्ते, मेट्रो, कोस्टल रोड, मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट व्यवस्था आणि ‘Mumbai One’ सारख्या एकात्मिक सुविधांमुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि जलद होत आहे. यामुळे वेळेची बचत, इंधनाची बचत आणि पर्यावरण संवर्धनाला मोठी मदत होत आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळत असून रोजगारनिर्मितीच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील दळणवळण सुधारल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक समतोल साधण्यास मदत होत आहे.

राज्य शासनाचे उद्दिष्ट केवळ प्रकल्प उभारणे नसून नागरिकांच्या जीवनमानात ठोस आणि सकारात्मक बदल घडवून आणणे हे आहे. पारदर्शक, जबाबदार आणि वेळेत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांद्वारे ‘विकसित महाराष्ट्र’ घडविण्याचा संकल्प आपण सर्वांनी एकत्रितपणे पूर्ण करायचा आहे.

आपल्या सहकार्याने आणि सहभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने व महाराष्ट्र राज्य प्रगतीच्या नव्या शिखरांकडे निश्चितपणे वाटचाल करेल, असा मला विश्वास आहे.

धन्यवाद! जय महाराष्ट्र!

Madhuri Misal

( माधुरी मिसाळ )
राज्यमंत्री, नगर विकास, महाराष्ट्र राज्य



# विकसित महाराष्ट्र - विकसित महानगर
# वार्षिक अर्थसंकल्प सन २०२६-२७

## महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे निवेदन

अध्यक्ष महोदय,

दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने **'उत्सव विकासाचा'** हा कार्यक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात आला. प्राधिकरणाने हाती घेतलेले अनेक विकास प्रकल्प मार्गी लागत असून महानगर प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयपूर्तीकडे होत असलेली समाधानकारक वाटचाल पाहता, सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

मा. पंतप्रधान यांचे **'विकसित भारत २०४७'** चे उद्दिष्ट, निती आयोगाचे शहर-क्षेत्रांना **'ग्रोथ हब'** (Growth Hub) म्हणून विकसित करण्याचे धोरण, महाराष्ट्र राज्याला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा संकल्प, तसेच मुंबई महानगर प्रदेशात थेट परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित करून आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापारी केंद्रे विकसित करणे, या सर्व उद्दिष्टांना पूरक अशी आवश्यक पायाभूत साधने उभारण्याचे नियोजन प्राधिकरणाने केले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेल्या शाश्वत विकास ध्येयांनुसार (Sustainable Development Goals), महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास साधणे व नागरिकांचे जीवनमान उंचावणे हे प्राधिकरणाने निश्चित केलेले ध्येय आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ अन्वये दिनांक २६ जानेवारी १९७५ रोजी प्राधिकरणाची स्थापना झाली. मंजूर प्रादेशिक योजनेनुसार महानगर प्रदेशाचा शीघ्र, सुव्यवस्थित व समन्वित विकास व्हावा यासाठी नियोजन व समन्वय संस्था म्हणून प्राधिकरण कार्यरत आहे.

मुंबई महानगर प्रदेशाचे वाढीव क्षेत्र ६३२८ चौ.कि.मी. असून त्यामध्ये बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, पनवेल आणि मीरा-भाईंदर या ०९ महानगरपालिका, तसेच अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर, माथेरान, कर्जत, खोपोली, पेण, उरण, अलिबाग व पालघर या ०९ नगरपरिषदा आणि ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातील १४६९ गावांचा समावेश होतो.

मा. मुख्यमंत्री महोदय व मा. उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनानुसार प्राधिकरण विकासाचे 'Infrastructure Power House' म्हणून काम करीत आहे. नागरिकांसाठी जलद, सुकर, आरामदायी प्रवास, आर्थिक वृद्धी व दळणवळणाला चालना देण्यासाठी ५९ मिनिटांत मुंबईतील दोन्ही टोकांदरम्यान प्रवास शक्य होईल अशा उद्दिष्टाने एकात्मिक मेट्रो नेटवर्क अंतर्गत (MMR Integrated Network) ११ मेट्रो प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच शहरातील दळणवळण सुकर करण्यासाठी सुमारे ७० कि.मी. भुयारी मार्ग विकासाचे नियोजन आहे.

मुंबई महानगर प्रदेशाचे पुनर्रूपांकन (Reshaping MMR) करून आर्थिक विकासास चालना देण्याच्या उद्देशाने संवृद्धी विकास केंद्रे (Growth Centres) विकसित करण्यात येत आहेत.

मला अभिमानाने सांगावेसे वाटते की निती आयोगाची ग्रोथ हब संकल्पना राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले असून एमएमआरडीए च्या माध्यामातून मुंबई महानगर प्रदेशात ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जात आहे. राज्य शासनाच्या पुढाकारातून मुंबई ३.० शहराचा के.एस.सी. (कर्नाळा-साई-चिरनेर) नवनगर प्रकल्प आणि रायगड पेण ग्रोथ सेंटर या परिसरात सु-नियोजित विकास करण्यात येणार आहे. तसेच खारबाव एकात्मिक व्यवसाय केंद्र व वरळी येथील अधिसूचित क्षेत्र विकसित करण्याचे नियोजन आहे.

भविष्यकालीन शाश्वत पाणीपुरवठ्याची सोय उपलब्ध करण्यासाठी जलस्रोत विकास करण्याचे पद्धतशीर नियोजन करण्यात आले आहे.

यापूर्वी प्राधिकरणाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, मुंबई पारबंदर प्रकल्प, पूर्व मुक्त मार्ग, सांताक्रुज-चेंबूर जोड रस्ता, पादचारी उन्नत मार्ग तसेच भाडेतत्त्वावरील घरे आणि महानगर प्रदेशातील विविध रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, मेट्रो, पाणीपुरवठा प्रकल्प यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प राबविले आहेत.

प्रथमत: सन २०२५-२६ मध्ये प्राधिकरणाने साध्य केलेली उद्दिष्टे व सन्मान याबाबत आपणांस माहिती देताना आनंद होत आहे.

- दि. ०९.१०.२०२५ रोजी “**Mumbai One**” ॲपचे उद्‌घाटन मा. पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते करण्यात आले. हे ॲप भारतातील **Transport Stack** अंतर्गत पहिले सिंगल QR आधारित एकात्मिक मोबिलिटी ॲप असून मेट्रो, उपनगरी रेल्वे व बस सेवांसाठी सुलभ बहुविध प्रवासाची सुविधा देते.
- मेट्रो मार्गिका २ ब भाग-१ (मंडाळे डेपो ते डायमंड गार्डन) ची चाचणी (Trial Run) दि. १६.०४.२०२५ रोजी सुरू करण्यात आली.
- नुकतेच मेट्रो २ ब च्या पाचही स्थानकांना पर्यावरण स्थानके म्हणून आयजीबीसी कडून प्लॅटीनम हा सर्वोच्च अवॉर्ड मिळाला आहे.
- मेट्रो मार्गिका ९ भाग- १ (मीरा भाईंदर) ची तांत्रिक तपासणी धाव (Trial Run) दि. १४.०५.२०२५ रोजी सुरू करण्यात आली.
- मंडाळे डेपो येथील मुंबई मेट्रो प्रशिक्षण संस्थेचे (सिम्युलेटर इमारत) उद्‌घाटन दि. १४.०८.२०२५ रोजी करण्यात आले.
- सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोड भाग-१ अंतर्गत वाकोला जंक्शन येथील केबल-स्टे पूल दि. १४.०८.२०२५ रोजी वाहतुकीस खुला करण्यात आला. हा पूल **१०० मीटर त्रिज्येची वक्रता असलेला दक्षिण आशियातील पहिला केबल-स्टे पूल आहे**.

- मेट्रो मार्गिका ४ व ४अ (गायमुख-विजय गार्डन) भाग-१ ची तांत्रिक तपासणी धाव (Trial Run) दि.२२.०९.२०२५ रोजी सुरू करण्यात आली.
- घाटकोपर (पूर्व) येथील माता रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजना भाग-**१** चे भूमिपूजन दि. १४.१०.२०२५ रोजी संपन्न झाले.
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह भुयारी बोगदा प्रकल्पासाठी TBM यंत्राद्वारे बोगद्याचे काम दि.०३.१२.२०२५ रोजी सुरू करण्यात आले.
- राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स व सेवाकर्मी सुधारणा कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व मंडळे, महामंडळे, प्राधिकरण विभागामध्ये, प्राधिकरणातील प्रशासन विभागाने उत्कृष्ट सादरीकरण केले व "सेवाकर्मी सुधारणा कार्यक्रमामध्ये" राज्यात प्रथम क्रमांक, तसेच ई-गव्हर्नन्ससाठी ४ थे स्थान मिळवले आहे.
- प्राधिकरणाचाच भाग असलेल्या महा मुंबई मेट्रो या संस्थेने एकुण तिकीट विक्रीत कागदी तिकीटांऐवजी कागद विरहीत तिकीटांवर भर दिल्याने आतांपर्यत ७०% तिकीटे कागद विरहीत बुक केली जात आहेत. मेट्रो लाईन २ ब आणि ७ चा पहिला फेज २ एप्रिल, २०२२ मध्ये सुरु झाल्यापासुन आतापर्यंत २५ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला आहे.

**‘मजबूत पायाभूत सुविधा म्हणजे वेगवान विकासाची पूर्वअट आहे’**

**‘आज उभारलेली पायाभूत साधने उद्याच्या अर्थ व्यवस्थेला गती देतील’**

**‘अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांची मांडणी नव्हे, तर भविष्यासाठीची ठोस दिशा आहे’**

ही सूत्रे स्वीकारून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम २३ (१) व वित्तीय विनियम १९७६ मधील नियम ४ अन्वये, मुंबई महानगर प्रदेश विकास निधीचे सन २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२५-२६ चे सुधारित अंदाज टिप्पणीसह अवलोकनार्थ सादर करीत आहे.

- सन २०२६-२७ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज जमा रु. ४८,०७२.५७ कोटी प्रस्तावित असून, सन २०२५-२६ चा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज जमा रु. ३०,३१६.१८ कोटीच्या तुलनेत ५८.५७% ने जास्त आहेत.
- खर्च रु. ४८,०७२.४० कोटी इतका प्रस्तावित असून, सन २०२५-२६ चा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज खर्च रु. ३१,३१३.१३ कोटीच्या तुलनेत ५३.५२% ने जास्त आहे.

**सन २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय उत्पन्न रु. ४८,०७२.५७ कोटी असून त्यापैकी:**

जमिनीची विक्री रु. ११,१७७.९५ कोटी, प्रकल्प संचालन महसूल रु. ४४१.७१ कोटी, भू-भाडे/व्याज इ. रु. १,६६४.१९ कोटी, शासन अनुदाने व विकास हक्क हस्तांतरण रु. १,१८९.१४ कोटी, UTF रु. ६,३६८.४२ कोटी, दुय्यम कर्ज रु.३,५२०.०० कोटी, व कर्जाऊ रक्कमा रु. २३,७११.१६ कोटी इतकी जमा अपेक्षित आहे

**सन २०२६-२७ चा खर्च रु. ४८,०७२.४० कोटी असून त्यात:**

सामान्य प्रशासन खर्च रु. ४१०.५९ कोटी, प्रकल्प देखभाल-संचालन रु. ७९६.२४ कोटी, इसारा/अनामत परतफेड रु. ४०१ कोटी, सर्वे/अभ्यास रु. २४५.७८ कोटी, पायाभूत प्रकल्प अनुदाने रु. २३९.५७ कोटी, विकास प्रकल्प/योजना रु. ४२,०२६.१४ कोटी, कर्जमुद्दल परतफेड रु. ७०५.४८ कोटी, व व्याज/इतर शुल्क रु. ३,२४७.६० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**वित्तीय अधिक्य (Surplus)**

वरील जमा व खर्च लक्षात घेता, सन २०२६-२७ साठी रु. १७ लाखाचे अधिक्य दिसून येत असून जमा-खर्चात समतोल ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. येथे विशेषत्वाने नमूद करतो की, सन २०१७-१८ नंतरचा हा प्राधिकरणाचा प्रथमच अधिक्य असलेला अर्थसंकल्प आहे.

हे अधिक्य केवळ आकड्यांपुरते नाही - हे प्राधिकरणामध्ये निर्माण झालेल्या वित्तीय शिस्त, काटेकोर नियोजन, महसूल-क्षमता वाढ आणि आर्थिक स्थिरतेचे स्पष्ट प्रतिबिंब आहे.

प्राधिकरणाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी निधीचे प्रमुख स्रोत जमिनीची विक्री, प्रकल्प संचालन महसूल व ठेवींवरील व्याज असे आहेत. त्याचबरोबर मागील काही आर्थिक वर्षांपासून शासनाकडून मिळणारे दुय्यम कर्ज, UTF अंतर्गत १% मुद्रांक शुल्क व १००% अतिरिक्त विकास आकार, केंद्र शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत भांडवली खर्चासाठी मिळणारे बिनव्याजी कर्ज, तसेच विविध संस्थांबरोबर केलेल्या सामंजस्य करारांमुळे (MoUs) निधी व कर्ज उभारणी सुलभतेसाठी मिळणारी शासन हमी - या सर्व घटकांमुळे प्राधिकरणाची वित्तीय क्षमता अधिक सक्षम झाली आहे.

**जागतिक स्तरावरील गुंतवणूक**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन २०२४, २०२५ आणि २०२६ च्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोस येथे सहभाग नोंदवत थेट परकीय गुंतवणूक (FDI) अनुक्रमे रु. ३,४६,००० कोटी व रु. २०,२०,२०० कोटी अशी एकूण रु.२३,६६,२०० कोटी गुंतवणूक - महानगर प्रदेशातील एकूण सहा महत्वाकांक्षी प्रकल्पांसाठी आकर्षित केली आहे.

ही जागतिक गुंतवणूक प्राधिकरणाच्या विकासात्मक वाटचालीवर जागतिक विश्वास दर्शवित असून महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी उचललेले ठाम पाऊल आहे.

- यासोबतच, मागील तीन वर्षांमध्ये प्राधिकरणाने जागतिक आर्थिक परिषदेत दावोस, येथे आंतरराष्ट्रीय सामंज्यस्य करार (MoU) साक्षांकित केले आहे. त्यांच्या अंमलबजावणीची सुरूवात झाली असून त्याआधारीत प्रकल्प कार्यान्वित झाले आहे. यासोबतच, मागील तीन वर्षांतील आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार (MoU) कार्यक्षमतेचा उल्लेख करणे मला महत्त्वाचे वाटते - कारण आजचा आंतरराष्ट्रीय सहभाग हा "स्वाक्षरी"पुरता मर्यादित नाही, तर अंमलबजावणीवर आधारित आहे.
- २०२४ मध्ये झालेले ४ सामंजस्य करार (MoU) सक्रिय आहेत.
- तसेच मागील वर्षी झालेल्या ११ सामंजस्य करारा (MoUs) पैकी १० सक्रिय आहेत.

- यावर्षी आम्ही २३ सामजंस्य करार - MoUs केले आहेत— त्यापैकी ११ सामंजस्य करार हे तांत्रिक असून त्यातून ज्ञान-सहकार्य, तंत्रज्ञान, क्षमता-वृद्धी, प्रशिक्षण, तसेच जागतिक दर्जाची संस्थात्मक भागीदारी पुढे नेण्याचा प्राधिकरणाचा स्पष्ट हेतू आहे. यामध्ये The Alan Turing Institute-UK, University of California, Berkeley (UC Berkeley)-USA, TU Delft-Netherland, Technical University of Munich (TUM)-Germany, यांसारख्या अत्यंत नामांकित आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांच्या सहभागामुळे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वृद्धिंगत होईल आणि जागतिक स्तरावरील प्रकल्प अंमलबजावणीच्या "सर्वोत्तम पद्धती"चा प्रकल्प अंमलबजावणीमध्ये वापर केला जाईल. विशेषत्वाने नमूद करतो की The Alan Turing Institute ही युनायटेड किंगडममधील अग्रगण्य AI/डेटा सायन्स संशोधन संस्था असून तिच्या Oxford (जगात क्रमांक ४), Cambridge (जगात क्रमांक ६), UCL (जागतिक क्रमांक ९) Edinburgh (जगात क्रमांक ३४), यांचा सहभाग आहे - म्हणजेच या सहकार्यामुळे एमएमआरडीएला जागतिक दर्जाचे ज्ञान-जाळे, संशोधनाधारित दृष्टिकोन आणि बेस्ट प्रॅक्टिसेसचा थेट लाभ मिळणार आहे.

जागतिक सहकार्याच्या अनुषंगाने, एमएमआरडीएने Urban Future Collective सोबत सामंजस्य करार (MoU) केला असून, 'डिजिटल ट्विन्स' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशातील शहरी नियोजन अधिक डेटा-आधारित, कार्यक्षम आणि नागरिककेंद्री बनविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. डिजिटल ट्विन्समुळे वाहतूक, पायाभूत सुविधा, पर्यावरण आणि सार्वजनिक सेवांचे रिअल-टाइम मॉडेलिंग व भविष्यवेधी नियोजन शक्य होऊन शहरी राहणीमान (urban livability) अधिक सुधारण्यास मदत होणार आहे. या सहकार्यामध्ये जागतिक स्तरावर अग्रगण्य MIT Media Lab USA सोबत UCL (University College London) UK आणि University of Hamburg , Germany यांसारख्या नामांकित संस्थांचा सहभाग असून, त्यामुळे एमएमआरडीएला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्वोत्तम पद्धतींचा थेट लाभ मिळणार आहे.

प्राधिकरणाने आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी रु. ४८,०७२.४० कोटी इतकी तरतूद केली आहे. त्यामध्ये विकास प्रकल्प व योजनांसाठी एकूण खर्चाच्या ८७.४२%, म्हणजेच रु. ४२,०२६.१४ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद केलेली आहे.

विकासाचा उत्सव साजरा करीत असताना, महानगरातील नागरिकांना मेट्रो मार्गिका २अ व ७ सेवेत दाखल करण्यात आल्या असून दररोज ३ लाख प्रवासी या सेवेचा लाभ घेत आहेत व प्रतिदिन अंदाजे रु. ४० लाख इतका महसूल प्राप्त होत आहे.

अटल बिहारी वाजपेयी-शिवडी न्हावा शेवा अटल सेतू (MTHL) प्रकल्पाचा दररोज अंदाजे २३,००० वाहने वापर करीत असून प्रतिदिन अंदाजे रु. ६३ लाख इतका महसूल प्राप्त होत आहे.

वांद्रे कुर्ला संकुल जोड रस्ता, सांताक्रुज-चेंबूर जोडरस्ता प्रकल्पातील केबल स्टे पूल, ऐरोली कटाई नाका ते ठाणे बेलापूर रस्त्यावरील भारत बिजली मार्गिका, एकात्मिक तिकीट प्रणाली यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांचा प्रवास सुकर, जलद व आरामदायी झाला आहे.

सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमुळे नागरिकांना स्वच्छ, मुबलक व शाश्वत पाणीपुरवठा होत असून वसई-विरार महानगरपालिकेतील जवळपास १४ लाख लोकसंख्येस पाणीपुरवठा होत आहे व दरमहा अंदाजे रु. ६ कोटी इतका महसूल प्राप्त होत आहे.

प्राधिकरणाच्या सर्वांगिण नियोजित शहरीकरणामुळे सेवा, औद्योगिक व पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होत असून आर्थिक वृद्धीस चालना मिळून ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल. हरित मुंबई महानगर प्रदेश विकास उद्देशाने पर्यावरणपूरक उपाययोजनांतर्गत प्रदेशाचा समतोल विकास साधण्याचा प्राधिकरणाचा दृष्टीकोन आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प सादर करताना मी आवर्जून नमूद करू इच्छितो की—एमएमआरडीए ही आज केवळ प्रकल्प राबविणारी संस्था नाही, तर वित्तीय शिस्त, कार्यक्षम अंमलबजावणी, जागतिक भागीदारी आणि नव्या पायाभूत मानकांची 'स्टँडर्ड-सेटर' संस्था म्हणून उदयास आली आहे.

आज एमएमआरडीए अनेक बाबतीत देशात "प्रथम" ठरली आहे—आणि ही 'प्रथम' कामगिरी ही केवळ प्रतिष्ठा नाही, तर महानगर प्रदेशाच्या भविष्यासाठीची विश्वसनीय क्षमता आहे.

- एमएमआरडीए ही भारताची सर्वात मोठी प्रादेशिक विकास संस्था असून, आकारमान व क्षमता यांच्या दृष्टीने जागतिक पातळीवरही अव्वल पाच विकास संस्थांमध्ये समाविष्ट आहे.
- एमएमआरडीए ने भारतातील सर्वात लांब सागरी सेतू—अटल सेतू मुंबई व नवी मुंबई यांना जोडून पूर्णत्वास नेला आहे.
- एमएमआरडीए हे भारतातील पहिले महानगर प्राधिकरण आहे जी एका शहर-प्रदेशात सर्वात मोठे शहरी भुयारी बोगदा-जाळे नियोजित करत आहे.
- एमएमआरडीए हे भारतातील व जगातील पहिले महानगर प्राधिकरण आहे जे एकाच वेळी देशातील सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क घडवित आहे, तसेच संकल्पित करून अंमलबजावणीच्या पातळीवर आणले आहे.
- एमएमआरडीए ही भारतातील पहिली निमशासकीय संस्था आहे जिने आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार (MoUs) द्वारे मोठ्या प्रमाणावर जागतिक थेट गुंतवणुक मिळवली आहे.
- एमएमआरडीए ही भारतातील पहिली city-region authority आहे जिने WEF- जागतिक आर्थिक मंचासोबत थेट सामंजस्य करार (MoUs) केला आहे.
- एमएमआरडीए हे भारतातील पहिली शहरी विकास संस्था आहे जिने एका WEF दावोस engagement मध्ये USD २७० बिलियन डॉलर पेक्षा अधिक जागतिक गुंतवणूक-प्रतिबद्धता (investment commitments) उभारली आहे.
- एमएमआरडीए ही भारतातील पहिली मेट्रो/मल्टीमोडल संस्था आहे जिने Mumbai One या एकाच प्लॅटफॉर्मद्वारे प्रदेशव्यापी बहुविध डिजिटल तिकीट प्रणाली (region-wide multimodal digital ticketing) अंमलात आणली आहे आणि ज्यात उपनगरीय रेल्वे ही सामिल आहे.

- एमएमआरडीए ही भारतातील पहिली city-region authority आहे जिने multi-ring road strategy संकल्पित करून अंमलबजावणीच्या दिशेने नेली आहे.
- एमएमआरडीए ही भारतातील पहिली शहरी संस्था आहे जिने मेगासिटीमध्ये राहत्या इमारतीखालून (live megacity) जगातील काही अत्यंत खोल भुयारी रस्ते बोगदे उभारण्याचे धाडस केले आहे.
- एमएमआरडीएने वित्तीय ताणाच्या टप्प्यातून बाहेर येत एकाच नेतृत्वकाळात जागतिक दर्जाची आर्थिक स्थिरता निर्माण केली—आणि त्याचेच प्रत्यक्ष द्योतक म्हणजे सन २०१७-१८ नंतरचा हा पहिला अधिक्य (surplus) अर्थसंकल्प.
- एमएमआरडीए ही भारतातील पहिले प्राधिकरण आहे जे विकासकाच्या भमिकेतून देशातील सर्वात मोठ्या एकात्मिक झोपडपट्टी पुनर्विकास कार्यक्रमांपैकी एक—माता रमाबाई आंबेडकर नगर—हाती घेऊन नागरिकांना सुरक्षित व सन्मानजनक निवास देण्याचा मार्ग खुला करत आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय व मा. उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या नेतृत्वाखाली प्राधिकरण उल्लेखनीय कामगिरी करीत आहे. त्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी आभारी आहे. तसेच प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांचे देखील मी आभार मानतो.

तरी कृपया प्राधिकरणाचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे; त्यास मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

**डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र.से.**
महानगर आयुक्त
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**मुंबई,**
**दिनांक: १६ फेब्रुवारी, २०२६**

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण १६० वी बैठक

## दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२६

## बाब क्र. ०१ : प्राधिकरणाचा सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना दिनांक २६ जानेवारी १९७५ रोजी झाली. मुंबई महानगर प्रदेशाचे क्षेत्र ६३२८ चौ.कि.मी. असून त्यामध्ये बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी –निजामपूर, वसई-विरार, पनवेल आणि मीरा-भाईंदर या ०९ महानगरपालिका आणि अंबरनाथ, कुळगांव- बदलापूर, माथेरान, कर्जत, खोपोली, पेण, उरण, अलिबाग व पालघर या ०९ नगरपरिषदा तसेच ठाणे रायगड व पालघर जिल्ह्यातील १४६९ गावांचा समावेश होतो.

मुंबई महानगर प्रदेशाच्या मंजूर प्रादेशिक योजनेनुसार जलद व सुव्यवस्थित विकास व्हावा यासाठी नियोजन व समन्वय संस्था म्हणून हे प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

प्रादेशिक महत्त्वाचे प्रकल्प तयार करणे व त्यास अर्थसाह्य देणे, स्थानिक संस्थांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना मदत करणे, मुंबई महानगर प्रदेश यातील संतुलित विकासाच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधणे आणि प्रदेशाचा समतोल विकास होऊ शकेल अशा सर्व बाबींचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यांमध्ये समावेश आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, मुंबई पारबंदर प्रकल्प (अटल सेतू), पूर्व मुक्त मार्ग, सांताक्रुज चेंबूर रोड रस्ता, पादचारी उन्नत मार्ग, मोनोरेल प्रकल्प व भाडेतत्त्वावरील घरे, मुंबई, ठाणे व उर्वरित महानगर प्रदेश क्षेत्रात विविध रस्ते, उड्डाणपुल, भुयारी मार्ग, मेट्रो यासारखे महत्त्वाचे प्रकल्प राबवित आहे.

तसेच मुंबई महानगर प्रदेशाचे पुर्नरुपांकन (Reshaping MMR) करून आर्थिक विकासास चालना देण्याच्या उद्देशाने संवृध्दी विकास केंद्रे (Growth Centres) विकसित करण्यात येत आहेत.

राज्य शासनाच्या पुढाकारातून **मुंबई ३.०** शहराचा के.एस.सी. (कर्नाळा-साई चिरनेर) नवनगर प्रकल्प, रायगड पेण ग्रोथ सेंटर या परिसरात सु-नियोजित विकास करण्यात येणार आहे.

तसेच खारबाव एकात्मिक व्यवसाय केंद्र व वरळी येथील अधिसूचित क्षेत्र विकसित करण्याचे नियोजन आहे.

भविष्यकालीन शाश्वत पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध करण्यासाठी जलस्रोताचा विकास करण्याचे पद्धतशीर नियोजन करण्यात आले आहे.

### <u>मुंबई महानगर प्रदेश - ग्रोथ हब</u>

निती आयोगाने शहर क्षेत्रांना ग्रोथ हब (G-Hub) म्हणून विकसित करण्याची संकल्पना राबविली असून G-Hub नावाच्या या संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राची (महाराष्ट्र) पायलट सिटीरिजन म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन मुंबई महानगर क्षेत्राचा कालबध्द विकास करण्याकरिता Developing MMR as Global Economic Hub हा अहवाल दिनांक १२/०९/२०२४ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे.

मुंबई महानगर प्रदेश आर्थिक बृहत आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात आलेल्या ग्रोथ हब नियामक मंडळ व ग्रोथ हब समन्वय समिती यांना सहाय्य करण्याकरिता मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची अंमलबजावणी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्या अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी युनिट स्थापन करण्यास दिनांक १२/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

यांस अनुसरुन, निती आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करुन मुंबई महानगर प्रदेशात थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

**अर्थसंकल्पाचे आकारमान:**

सन २०२६-२७ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज जमा रु. ४८,०७२.५७ कोटी प्रस्तावित असून सन २०२५-२६ चा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज जमा रक्कमेच्या रु. ३०,३१६.१८ कोटीच्या तुलनेत **५८.५७%** ने जास्त आहे व खर्च रु.४८,०७२.४० कोटी इतके प्रस्तावित असून ते सन २०२५-२६ चा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज खर्च रु.३१,३१३.१३ कोटीच्या तुलनेत **५३.५२%** ने जास्त आहे.

**उत्पन्नाचे स्त्रोत:**

सन २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय उत्पन्न रु. ४८,०७२.५७ कोटी इतके असून त्यापैकी जमिनीची विक्री रु.११,१७७.९५ कोटी, प्रकल्प संचालन महसूल रु.४४१.७१ कोटी, भू-भाडे, व्याज, इत्यादी रक्कमा रु.१,६६४.१९ कोटी, शासनाचे अनुदाने व विकास हक्क हस्तांतरण रु.१,१८९.१४ कोटी, नागरी परिवहन निधी (UTF) रु.६,३६८.४२ कोटी, राज्य शासनाकडून पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी मिळणारे दुय्यम कर्ज रु. ३,५२०.०० कोटी, व कर्जाऊ घेतलेल्या रक्कमा रु. २३,७११.१६ कोटी इतकी जमा अपेक्षित आहे.

**खर्चाचा तपशील:**

सन २०२६-२७ चा अर्थसंकल्पीय खर्च रु. ४८,०७२.४० कोटी इतका असून त्यापैकी सामान्य प्रशासनावरील खर्च आणि कर्मचारी वर्गास अग्रीमे व कर्ज रु. ४१०.५९ कोटी, प्रकल्प देखभाल व संचालन खर्च रु.७९६.२४ कोटी, इसारा व अनामत रक्कम परतफेड रु.४०१ कोटी, सर्वेक्षण, अभ्यास यासाठी तरतूद रु.२४५.७८ कोटी, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अनुदाने रु. २३९.५७ कोटी, विकास प्रकल्प व योजनांसाठी तरतूद रु.४२,०२६.१४ कोटी, कर्जाऊ मुद्दल रक्कमेची परतफेड रु. ७०५.४८ कोटी व कर्जाऊ रक्कमेवरील व्याज व इतर शुल्क रु. ३,२४७.६० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**वित्तीय अधिक्य:**

वरील जमा व खर्च लक्षात घेता सन २०२६-२७ साठीच्या अर्थसंकल्पात **रु. १७ लाखाचे** अधिक्य दिसून येत असून जमा खर्चात समतोल ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. येथे असे नमूद करण्यात येते की, प्राधिकरणाचा सन २०१७-१८ नंतरचा हा अधिक्य असलेला अर्थसंकल्प आहे.

**शासन अर्थसहाय्य:**

प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी मुख्यत्त्वाने असलेले निधीचे स्त्रोत म्हणजे जमिनीची विक्री, प्रकल्प संचालन महसूल व ठेवींवरील व्याज असे आहेत. त्याचबरोबर मागील काही आर्थिक वर्षापासून प्रामुख्याने शासनाकडून मिळणारे दुय्यम कर्ज, नागरी परिवहन निधी अंतर्गत मिळणारे १% मुद्रांक शुल्क व १००% अतिरिक्त विकास आकार, केंद्र शासनाच्या विशेष योजने अंतर्गत भांडवली खर्चासाठी मिळणारे बिनव्याजी कर्ज. तसेच विविध संस्थांबरोबर करण्यात आलेल्या सामंजस्य करारातून (MoU) निधी उभारणी व कर्ज उभारणी सुलभतेने होण्यासाठी मिळणारी शासन हमी या गोष्टींचा समावेश आहे.

**महानगर प्रदेशातील विकासासाठी जागतिक स्तरावरील गुंतवणूक:**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन २०२५ आणि २०२६ च्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोस येथील जागतिक व्यासपीठावर सहभाग नोंदवत, थेट परकीय गुंतवणूक (FDI) अनुक्रमे रु. ३,४६,००० कोटी व रु.२०,२०,२०० कोटी अशी एकूण रु. २३,६६,२०० कोटी एवढी गुंतवणूक मुंबई महानगर प्रदेशामधील महत्वाकांक्षी प्रकल्पांसाठी आकर्षित करून महाराष्ट्राच्या विकासाला चालना मिळणार आहे.

सदरची जागतिक गुंतवणूक ही महानगर प्राधिकरणाच्या विकासात्मक वाटचालीवर विश्वास दर्शवित असून महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थ व्यवस्थेकडे नेण्यासाठी उचलेले ठाम पाऊल आहे.

**अर्थसंकल्पाची वैशिष्टे:**

प्राधिकरणाने आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी रु. ४८,०७२.४० कोटी इतकी तदतूद केली आहे. त्यामध्ये विकास प्रकल्प व योजनांसाठी एकूण खर्चाच्या **८७.४२%** म्हणजेच रु.४२,०२६.१४ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद केलेली आहे.

**अ) सन २०२५-२६ वर्षातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा**

**१) पुनर्निर्मित मुंबई महानगर प्रदेश - शहर संपर्क आणि विकास - भुयारी मार्ग (Rebooting MMR, City Connectivity & Development)**

मुंबई महानगर प्रदेश हा देशाचा आर्थिक कणा आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहतूक यामुळे शहर संपर्क व्यवस्थेवर मोठा ताण आला आहे. या पार्श्वभूमीवर Rebooting MMR ही गरज असून, भुयारी मार्गांचा विस्तार हा त्याचा महत्त्वाचा भाग आहे. भुयारी मार्गांमुळे प्रवासाचा वेळ कमी होईल, वाहतूक कोंडी व प्रदूषणात घट होईल आणि पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण जोडणी अधिक सुलभ होईल. मर्यादित भूभागाचा प्रभावी वापर करताना पर्यावरण संरक्षणालाही मदत होईल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राबविलेले भुयारी मार्ग प्रकल्प हे शाश्वत शहरी विकासासाठी आवश्यक असून, ते मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच चालना देतील. या प्रगती पथावरील प्रकल्पांसाठी आगामी वर्षात पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | मूळ अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| १. | ऑरेंज गेट, पुर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह सागरी किनारा भुयारी मार्ग | १८१३.४० | ९१९.०० | १२५०.०० |
| २. | ठाणे घोडबंदर रस्त्यावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल जंक्शन पर्यंतच्या भुयारी मार्ग बांधणे | १२००.०० | १०.०० | ७५.०० |
| ३. | ठाणे ते बोरीवली चार पदरी भुयारी मार्ग | २६८४.०० | २१६४.११ | ३०२९.५१ |
| ४. | वरळी-वांद्रे सागरी सेतू पासून वांद्रे-कुर्ला संकुल हायस्पीड रेल स्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) ला जोडणारा मुंबई एकात्मिक बोगदा प्रकल्प | ०.०० | १०.०० | ११८९.०० |
| | **एकूण** | **५६९७.४०** | **३१०३.११** | **५५४३.५१** |

**२) मुख्य दळणवळण मार्ग व रिंग रोड प्रकल्प**

**(Major Arterial Connectivity & Ring Road Projects in MMR)**

वेगाने वाढणारी लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि दैनंदिन प्रवासाची वाढती गरज लक्षात घेता, मुख्य दळणवळण मार्ग आणि रिंग रोड प्रकल्प हे मुंबई महानगर प्रदेशाच्या वाहतूक व्यवस्थेसाठी अत्यंत आवश्यक ठरत आहेत. या मार्गांमुळे शहरातील तसेच उपनगरातील प्रमुख केंद्रांमधील जलद व अखंड संपर्क सुनिश्चित होत आहे. रिंग रोड प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक बाहेरील मार्गाने वळविणे शक्य होऊन अंतर्गत रस्त्यांवरील ताण कमी होणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन वाहतूक कोंडीत घट आणि इंधन बचत होणार आहे. तसेच प्रदुषण नियंत्रणास मदत होणार आहे. या प्रकल्पांमुळे उद्योग, व्यापार आणि लॉजिस्टिक्ससाठी सक्षम दळणवळण व्यवस्था उपलब्ध होणार आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेशाच्या शाश्वत व भविष्योन्मुख विकासासाठी महत्वाची पायाभूत सुविधा ठरणार आहेत. या प्रगती पथावरील प्रकल्पांसाठी आगामी वर्षात पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | मूळ अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| १. | अटल बिहारी वाजपेयी - शिवडी न्हावा शेवा अटल सेतू (MTHL) ते मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाचे बांधकाम | ५१०.०० | ५१०.५० | ६०३.०० |
| २. | पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत उन्नत मार्गाचे बांधकाम करणे | ५००.०० | ६६६.१७ | ८८०.१२ |
| ३. | बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाचे (ठाणे कोस्टल रोड) बांधकाम करणे. | ६००.०० | १०५०.९० | १०२५.७७ |
| ४. | फाउंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर पर्यंत उन्नत मार्ग बांधणे | १०००.०० | १०.०० | ७५.०० |
| ५. | कल्याण रिंग रोड प्रकल्प | ३१५.०० | २०६.०० | ६००.०० |
| ६. | वरळी ते शिवडी (पूर्व-पश्चिम) उन्नतमार्ग | ५७८.५० | ४१६.४२ | ९३६.०७ |
| | **एकूण** | **३५०३.५०** | **२८५९.९९** | **४११९.९६** |

### ३) मुंबई महानगर मेट्रो रेल प्रकल्प – (MMR Integrated Metro Network)

बदलत्या काळानुसार मेट्रो ही मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांची जीवनवाहिनी म्हणून उदयास येत आहे. त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण महानगर क्षेत्रात ३३७ कि.मी. पेक्षा जास्त लांबीचे व अंदाजे रु. १ लाख कोटी खर्च अपेक्षित असलेले मेट्रोचे जाळे विणत आहे. त्या अंतर्गत ११ मेट्रो मार्गिकेचे बांधकाम प्रगतीपथावर असून मार्गिका २अ आणि ७ कार्यान्वित झाल्या आहेत, त्यास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून दररोज ३ लाख प्रवासी सुखद प्रवास करीत आहेत. उर्वरित मार्गिका लवकरच कार्यान्वित होऊन नागरिकांचा प्रवास सुखकर आणि वेगवान होणार आहे.

चालू वित्तीय वर्षात मेट्रो मार्गिका-२ब (डी.एन.नगर- मंडाळे) मधील टप्पा -१ (मंडाळे ते डायमंड गार्डन) आणि मेट्रो मार्गिका-९ (दहिसर ते मीरा भाईंदर) मधील टप्पा-१ (दहिसर पूर्व ते काशीगाव) नागरिकांसाठी कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. या प्रगती पथावरील प्रकल्पांसाठी आगामी वर्षात पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | मूळ अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| १. | मेट्रो मार्गिका २अ डी. एन. नगर, अंधेरी ते दहिसर | ११७.०० | ४१९.१० | ४५.१९ |
| २. | मेट्रो मार्गिका २ब डी. एन. नगर, अंधेरी ते मंडाळे | २१५५.८० | १७४५.०५ | १२२४.६० |
| ३. | मेट्रो मार्गिका ४ वडाळा ते कासारवडवली | ३२४७.५१ | २६४०.०६ | ३६३०.७१ |
| ४. | मेट्रो मार्गिका ४अ कासारवडवली ते गायमुख | २२.६६ | २६४.३१ | १७६.५४ |
| ५. | मेट्रो मार्गिका ५ ठाणे-भिवंडी-कल्याण | १५७९.९९ | ५२७.६२ | १३०९.३० |
| ६. | मेट्रो मार्गिका ५अ विस्तार दुर्गाडी ते उल्हासनगर | ५०.०० | १.०४ | १८३.३५ |
| ७. | मेट्रो मार्गिका ६ स्वामी समर्थ नगर ते कांजूरमार्ग | १३०३.४० | १२१८.३५ | २४०७.७८ |
| ८. | मेट्रो मार्गिका ७ अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व | १५५.९५ | ३१९.६१ | २४.०५ |
| ९. | मेट्रो मार्गिका ९ दहिसर ते मिरा-भाईंदर व ७अ अंधेरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ | ११८३.१३ | ८२७.२६ | ११५१.८७ |
| १०. | मेट्रो मार्गिका १० गायमुख ते शिवाजी चौक, मिरारोड | २००.०० | ५.०० | १००.०० |
| ११. | मेट्रो मार्गिका १२ कल्याण ते तळोजा | १५००.०० | ४६६.१५ | १०५४.५४ |
| १२. | मेट्रो मार्गिका १३ घोडबंदर ते विरार | ५००.०० | २.३० | २००.०० |
| १३. | मेट्रो मार्गिका १४ कांजूरमार्ग ते बदलापूर | ०.५० | ३.०० | ५००.०० |
| १४. | मंडाळे येथे मेट्रो भवन उभारणे | ३००.०० | ३००.०० | ४०३.३१ |
| १५. | मेट्रो रेल - मालवणी, मालाड व मंडाळे येथे कर्मचारी निवासस्थाने | २००.०० | २०१.३७ | २४८.९१ |
| १६. | कल्याण शिळफाटा जंक्शन-राजणोली चौक, भिवंडी दरम्यान उड्डाणपूलाचे बांधकाम | ०.०० | ४.०० | १५०.०० |
| १७. | Transport Stack - Digital Mobility Platform | ०.०० | ०.०० | २५.०० |
| | **एकूण** | **१२५१५.९४** | **८९४४.२२** | **१२८३५.१५** |

## ४) थोर नेत्यांची वैशिष्ट्यपूर्ण स्मारके
## (Iconic Memorials of Eminent Leaders)

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांच्या मानवतावादी विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाच्या दिनांक १९ मार्च २०१३ च्या अधिसूचनेनुसार, इंडिया युनायटेड मिल (इंदू मिल) क्र. ६, नगर रचना योजना क्र. ४, माहिम येथील अंतिम भूखंड क्र. ११६३ (सुमारे ४.८४ हेक्टर) जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या विकासासाठी प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(ब) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर स्मारकातील स्ट्रक्चरलची कामे १००% पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

**स्व. बाळासाहेब ठाकरे** हे देशाच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासातील अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढयांपर्यंत पोहचविण्यासाठी महापौर निवासस्थानाच्या परिसरात मा. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येत असून, या प्रकल्पात अस्तित्वातील वारसास्थळाचे जतन, इंटरप्रिटेशन सेंटर, प्रशासकीय इमारत, प्रवेशद्वार इमारत, इत्यादींचा समावेश आहे. सदर स्मारकातील टप्पा -१ चे काम पूर्ण झाले असून टप्पा -२ चे कामे हाती घेण्यात आली आहेत.

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | मूळ अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| १. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदुमिल येथील भव्य स्मारक | ४००.०० | १६९.५१ | ४००.०० |
| २. | महापौर मुंबई निवासस्थानाच्या परिसरात स्व.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक टप्पा -१ व २ | १०५.०० | १४.४८ | १७१.५० |
| | **एकूण** | **५०५.००** | **१८३.९९** | **५७१.५०** |

## ५) मुंबई पुनरुज्जीवन: सुधारणा व पुनर्बांधणी
## (Rebooting Mumbai: Improvements and Refurbishments - SRA Project)

मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधांसोबत विद्यमान वसाहतींची **सुधारणा व पुनर्विकास (Improvement & Refuirbushment)** करणे तितकेच महत्वाचे आहे. या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रकल्प हे **Rebooting Mumbai** या संकल्पनेचे प्रमुख घटक आहेत.

घाटकोपर (पूर्व) येथील माता रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी भू.क्र. १९४ (भाग) व १९५ (भाग) या सुमारे ३१.८२ हेक्टर क्षेत्रावर पसरलेली असून, सदर प्रकल्प संयुक्त भागीदारी तत्त्वावर झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणा सोबत राबविण्यात येत आहे. या पुनर्वसन प्रकल्पामध्ये अंदाजे १७००० सदनिका तयार होऊन त्यात पात्र झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसन करण्यात येणार आहे.

तसेच विविध R&R प्रकल्पांद्वारे बाधित नागरीकांचे पुनर्वसन सुनिश्चित करण्यात येत आहे. या प्रकल्पांमुळे सुरक्षित व भविष्योन्मुख शहर घडविण्याचे उद्दीष्टे सफल होत आहे. या प्रगती पथावरील प्रकल्पांसाठी आगामी वर्षात पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | मूळ अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| १. | माता रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनवर्सन प्रकल्प | ८५०.०० | १५५.२७ | ५५१.०० |
| २. | पुनर्वसन व पुनर्वसाहत (R & R) | २६५.८० | २४७.१४ | १५०.०० |
| ३. | परवडणारी घरे : भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण योजना | ३०.०० | २.०० | ३०.३३ |
| | **एकूण** | **११४५.८०** | **४०४.४१** | **७३१.३३** |

## ६) शाश्वत पाणीपुरवठा व जलस्त्रोत विकास प्रणाली (Water Source Creation and Sustainable Supply Project)

मुंबई महानगर क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांना स्वच्छ, मुबलक व शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, पुढील दोन दशकांतील लोकसंख्या व औद्योगिक वाढ लक्षात घेऊन प्राधिकरणामार्फत विविध जलस्त्रोत विकास व पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांमुळे मीरा भाईंदर महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका व पालघर जिल्हयातील ४४ गावे यांना फायदा होणार असून ३० लाख लोकसंख्येला पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाय साध्य होणार आहेत. तसेच कृषी सिंचनासाठी अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.

- **नवीन कवडास उन्नैयी बंधाऱ्याचे बांधकाम**

  पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात कवडास बंधाऱ्यात अतिरिक्त १३.४१ द.ल.घ.मि. पाणीसाठा निर्माण करण्यासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे जुन्या बंधाऱ्याच्या ६७ मी. खालील बाजूस नवीन बंधारा बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून आगामी आर्थिक वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **सुर्या नदीवर ५ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे बांधकाम**

  कवडास बंधाऱ्याच्या खालील भागात वाहत असलेलया सुर्या नदी पात्रात ५ वेगवेगळया ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधून अतिरिक्त २.९८ द.ल.घ.मि. इतका पाणीसाठा उपलब्ध होणार असून आगामी आर्थिक वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **देहरजी मध्यम प्रकल्प**

  विक्रमगड, जिल्हा पालघर येथे नवीन धरणाचे बांधकाम करून ९३.२२ द.ल.घ.मि. इतका पाणीसाठा निर्माण करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा लाभ वसई विरार शहर महानगरपालिका, सिडको, पालघर व मार्गस्त गावे यांना होणार असून सद्य:स्थितीत धरणाचे ८२% बांधकाम पूर्ण झाले आहे.

➢ **सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना**

मुंबई महानगर प्रदेशातील पश्चिम व उप-प्रदेशातील सध्याच्या पाण्याची कमतरता व भविष्यातील वाढीव गरज लक्षात घेऊन सुर्या धरणातून उपलब्ध असलेल्या ४०३ द.ल.घ.मि. प्रती दिन पाणी साठ्यावर योजना राबवून स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाचा टप्पा-१ कार्यान्वित झाला असून टप्पा-२ चे काम प्रगतीपथावर आहे.

याचबरोबर काळू, पोशीर व शिलार या प्रगती पथावरील प्रकल्पांसाठी आगामी वर्षात पुढील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | मूळ अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| १. | सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना | २४०.०० | २३१.०८ | २६७.०० |
| २. | कवडसा उनैयी बंधारा बांधकाम | ७५.०० | ८०.३० | ६९.५३ |
| ३. | सुर्या नदीवर ५ कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम | ३०.०० | १४.२० | ८.१९ |
| ४. | देहरजी मध्यम प्रकल्प | ७००.०० | ३२०.४३ | २४७.०७ |
| ५. | काळू प्रकल्प | ६००.०० | ५४.१० | १००.०० |
| ६. | पोशीर प्रकल्प | ०.०० | ५.०० | २१७.०० |
| ७. | शिलार प्रकल्प | ०.०० | ५.०० | ७२.०८ |
| | **एकूण** | **१६४५.००** | **७१०.११** | **९८०.८७** |

**ब)** **<u>सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात पूर्ण झालेले व मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा आढावा :</u>**

**१. पायाभुत सुविधा प्रकल्प**

➢ **सांताक्रुज-चेंबूर जोडरस्ता भाग-१ व २**

सदर भाग-१ व २ प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय किंमत रु. ८७७.१२ कोटी असून दोन्ही प्रकल्पाची लांबी ७.३ कि.मी. आहे. सदर प्रकल्पामुळे पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्ग आणि वांद्रे कुर्ला संकुल पर्यंत जोडणारा उन्नत मार्ग तयार होणार आहे. त्यामुळे वाहतूकीच्या वेळेत जवळपास ४५ मिनिटे कमी होऊन इंधनाची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

सदर प्रकल्पामधील **पानबाई शाळेजवळील वैशिष्ट्येपूर्ण केबल स्टेड पूलाचे** लोकार्पण दिनांक १४/०८/२०२५ रोजी करण्यात आले आहे. सदर केबल स्टेड ब्रीज २१५ मीटर लांबीचा आणि **दक्षिण आशियातील १०० मीटर त्रिज्येची वक्रता असलेला पहिला केबल स्टेड ब्रीज** आहे.

- **घोडबंदर रस्त्याचे कापूरबावडी ते गायमुख पर्यंत मुख्य रस्ता व सेवा रस्त्यांचे विलीनीकरण करून कॉक्रीटीकरण करणे.**

  प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रु. ५५९ कोटी असून रस्त्याची लांबी १०.३५ कि.मी. आहे. सदर प्रकल्पामुळे घोडबंदर रस्त्यवरील वाहतूकीची कोंडी कमी होऊन इंधन आणि वेळेची बचत होणार आहे. सदर प्रकल्प माहे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **तळोजा एमआयडीसी रोड ते अंबरनाथ-कटाई नाका रोड (भाग-२)**

  सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशाच्या पूर्वेकडील भागात येतो. तळोजा एमआयडीसी औद्योगिक पट्ट्याला जोडणारा हा रस्ता महत्वाचा प्रवेश मार्ग आहे. हा रस्ता खोणी गाव ते निठळस गाव असा आहे. रस्त्याची लांबी ९.०५ कि.मी. असून प्रशासकीय मान्यता रु.५५३.८९ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्प माहे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **ऐरोली कटाई नाका भाग-१ व २ उन्नत मार्ग**

  भाग-१ व २ प्रकल्पाची एकूण प्रशासकीय मान्यता रु. ५८४.२६ कोटी असून भाग-१ मध्ये ठाणे-बेलापूर मार्ग, ऐराली येथील भारत बिजली जंक्शन पासून ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर चढण्यासाठी ५२२ मी. लांबींचा अप आर्म आणि उतरण्यासाठी ३४१ मी. लांबीच्या डाऊन आर्म मार्गिकेचे बांधकाम आहे.

  भाग-२ हा उन्नत रस्त्याचा प्रकल्प २.५७ कि.मी. लांबीचा असून तो नवी मुंबईतील ऐरोली-मुलुंड रोड पासून ठाणे बेलापूर रोड पर्यंत विस्तारित आहे.

  या प्रकल्पांमुळे कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई दरम्यांनचे अंतर सुमारे ७ कि.मी. ने कमी होणार आहे. या प्रकल्पांचा लाभ उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर येथील नागरिकांनाही होणार आहे. सदर प्रकल्प माहे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**२. मेट्रो प्रकल्प**

- **मेट्रो मार्गिका ४अ (कासारवडवली ते गायमुख) कासारवडवली येथील उड्डाणपुल क्र.१**

  सदर उड्डाणपुल मेट्रो मार्ग-४अ संरेखना दरम्यान असून त्याची लांबी ७२१ मी. आहे. प्रकल्पाची किंमत रु.२४ कोटी इतकी आहे. सदर उड्डाणपुलाचे लोकार्पण दिनांक ०८ जुलै, २०२५ रोजी करण्यात आले.

- **मेट्रो मार्गिका ४अ (कासारवडवली ते गायमुख) भाईंदरपाडा येथील उड्डाणपुल क्र.२**

  सदर उड्डाणपुल मेट्रो मार्ग-४अ संरेखना दरम्यान असून त्याची लांबी ६०१ मी. आहे. प्रकल्पाची किंमत रु.३४ कोटी इतकी आहे. सदर उड्डाणपुलाचे लोकार्पण दिनांक १४ मे, २०२५ रोजी करण्यात आले.

- **मेट्रो मार्गिका २ ब (डी.एन.नगर ते मंडाळे) मधील टप्पा-१ (मंडाळे ते डायमंड गार्डन)**

  मेट्रो मार्गिका २ ब चा टप्पा-१ हा मंडाळे ते डायमंड गार्डन असून त्याची लांबी ५.६ कि.मी. आहे व यामध्ये ५ स्थानकांचा समावेश आहे. टप्पा-१ प्रकल्पाची किमंत रु. २४४५ कोटी असून सदर प्रकल्प चालू वित्तीय वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ९ (दहिसर ते मिरा-भाईंदर) मधील टप्पा-१ (दहिसर पूर्व ते काशीगाव)**

  मेट्रो मार्गिका ९ चा टप्पा-१ हा दहिसर पूर्व ते काशीगाव असा असून त्याची लांबी ४.५ कि.मी. आहे व यामध्ये ४ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु.१००० कोटी इतकी आहे. सदर मार्गामुळे मिरा-भाईंदर शहर मुंबई उपनगरास मेट्रोने जोडले जाणार आहे. सदर प्रकल्प चालू वित्तीय वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ९ (दहिसर ते मिरा-भाईंदर) भाईंदर येथील उड्डाणपुल क्र.३**

  सदर उड्डाणपुल मेट्रो मार्गिका-९ संरेखना दरम्यान दिपक हॉस्पिटल ते फाटक रस्त्याजवळ असून त्याची लांबी १.२ कि.मी. आहे. प्रकल्पाची किमंत रु. ७५ कोटी असून सदर प्रकल्प चालू वित्तीय वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**क) <u>सन २०२६-२७ वर्षातील नवीन आणि महत्त्वाचे प्रकल्प</u>**

**१) विकास केंद्रांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाचे पुनर्रुपांकन -**
**मुंबई ३.० शहराचा विकास**
**(Reshaping MMR through Growth Hubs)**

राज्याची ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी Growth Hub च्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाचे पुर्नरुपांकन करणे ही काळाची गरज आहे. Growth Hub म्हणजे नियोजनबद्ध पद्धतीने विकसित करण्यात येणारी शहरी केंद्रे असून, येथे सेवा, उद्योग, रोजगार, निवास, शिक्षण व सार्वजनिक सुविधा एकाच परिसरात उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. यामुळे महानगराचा समतोल व समावेशक विकास साधता येणार आहे. यामध्ये मुंबई ३.० शहर म्हणून रायगड-पेण, कर्नाळा-साई-चिरनेर या प्रदेशांचा सुनियोजित विकास करावयाचा आहे.

- **के.एस.सी. (कर्नाळा-साई-चिरनेर) नवनगर प्रकल्प**

  मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रातील जमिनींच्या संभाव्य मूल्यवृद्धीचा नियोजित वापर करून क्षेत्राचा समतोल व शाश्वत विकास साधण्यासाठी शासनाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्राधिकरणाची सदर क्षेत्रासाठी नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण व पेण तालुक्यातील एकूण १२४ गावे समाविष्ट असून क्षेत्रफळ सुमारे ३२३.४४ चौ.कि.मी. आहे. हे

क्षेत्र के.एस.सी. (कर्नाळा-साई-चिरनेर) नवनगर म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. सदर क्षेत्र विकसित करण्यासाठी आगामी अर्थसंकल्पात **रु.४००० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **रायगड पेण ग्रोथ सेंटर**

  प्राधिकरणाने रायगड पेण ग्रोथ सेंटर विकसित करण्यासाठी दिनांक २४/०३/२०२३ रोजी मे. कर्नाळा पेण ग्रोथ सेंटर लि. ("खाजगी क्षेत्र भागीदार" किंवा "PSP" प्रथम पक्ष) व मे. क्यू-वेस्ट इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्यासोबत संयुक्त उपक्रम करार (Joint Venture Agreement) केला आहे. त्यानुसार प्राधिकरणाने मे. कर्नाळा पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या समवेत "रायगड पेण ग्रोथ सेंटर लि." या नावाने विशेष प्रयोजन कंपनी कार्यान्वित केली आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु.५०० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **खारबाव एकात्मिक व्यवसाय केंद्र अधिसूचित क्षेत्र (KIBPNA)**

  नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्राधिकरणाची सदर प्रकल्पासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ५८.५२ चौ. कि.मी. असून यामध्ये खारबाव (CT), मालोडी, पाये, पायेगांव, खर्डी, पालीवली, फिंगरपाडा, गणे, ब्राम्हणगाव, ता. भिवंडी आणि नागळे ता. वसई या १० गावांचा समावेश आहे. सदर क्षेत्रांचे सर्वेक्षण करणे, विकास आराखडा तयार करणे याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. १०० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

२) **समृध्दी महामार्ग / द्रुतगती मार्ग जोडणी प्रकल्प**

मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी कमी करणे, प्रवासाचा कालावधी घटविणे व प्रादेशिक जोडणी बळकट करण्यासाठी

- **समृध्दी महामार्ग साकेत-आमणे अखंड जोडणी मार्ग**

  सदर प्रकल्पाची लांबी २१.३ कि.मी. असून प्रशासकीय मान्यता रु. ६२०२ कोटी इतकी आहे. या मार्गावर अनेक महत्वाचे इंटर चेंजेस निर्माण करून ठाणे कोस्टल रोड खारेगाव येथे, विरार अलिबाग मल्टीमॉडेल कासेळी येथे शिळ कल्याण उड्डाणपुल राजनोली येथे आणि वडोदरा मुंबई एक्सप्रेस वे आमने जवळ जोडले जाणार आहेत. या रस्त्यामुळे समृध्दी मार्गाची जोडणी अधिक सुलभ आणि गतीमान होणार आहे. यासाठी आगामी वर्षात **तरतूद रु. ५०० कोटी** करण्यात आली आहे.

- **मुंबई-वाढवण द्रुतगती मार्ग जोडणी (उत्तन-विरार सागरी सेतु)**

  प्रकल्पाची एकूण लांबी ५५.१२ कि.मी. (जोड रस्त्यासह) असून सुधारित प्रशासकीय मान्यता रु.५८,७५४.७१ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्पामुळे दक्षिणेकडील मुंबई आणि उत्तरेकडील पालघर जिल्हा अशी जोडणी होणार असून पुढे दिल्ली-मुंबई महामार्गाशी जोडला जाणार आहे. प्रकल्पातील आधुनिक पायाभूत सुविधांमुळे आणि

आंतरबदलामुळे प्रवास आणि वाहतूकीत सुधारणा होणार आहेत. प्रादेशिक अर्थ व्यवस्थेला चालना मिळून उद्योग वाढ, रोजगार निर्मिती, पर्यटन क्षेत्र विकासातून आर्थिक वृध्दी, मालमत्ता व महसूलात वाढ होणार आहे. प्रकल्पामुळे हवा व ध्वनी प्रदुषण कमी होईल. यासाठी आगामी वर्षात **तरतूद रु.२००० कोटी** करण्यात आली आहे.

**३) भुयारी मार्गांचा विस्तार**

**वरळी वांद्रे सेतू पासून वांद्रे कुर्ला संकुल हायस्पीड रेल स्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) ला जोडणारा मुंबई एकात्मिक भुयारी प्रकल्प**

प्रस्तावित भुयारी मार्ग ७० कि.मी. एवढ्या लांबींचा असुन ३ टप्प्यात राबविण्यात येणार आहे. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता अंदाजित रु. २४००० कोटी इतकी आहे.

- टप्पा १ मध्ये १६ कि.मी. लांबीचा बोगदा प्रस्तावित असून सदर बोगदा मेट्रो आणि बुलेट ट्रेन मार्गाशी जोडला जाणार आहे.
- टप्पा २ सुमारे १० कि.मी. चा बोगदा असून पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गांना जोडला जाणार आहे.
- टप्पा ३ सुमारे ४४ कि.मी.चा असून उत्तर दक्षिण भूमिगत कॉरिडॉर तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर भुयारी मार्ग शहरातील विद्यमान वाहतूक प्रकल्पांना पूरक ठरून, वाहतूकीचा प्रवास सुलभ करणे, कालावधी कमी करणे, इंधन खर्चात बचत करणे व पर्यावरणीय दृष्टीकोनातून सकारात्मक परिणाम साधने यासाठी उपयुक्त ठरणार आहे. यासाठी आगामी वर्षात **तरतूद रु. १,१८९ कोटी** करण्यात आली आहे.

**४) हरित मुंबई महानगर प्रदेश, शाश्वत शहर**
**(Green MMR - Sustainable City)**

मुंबई महानगर प्रदेश वाढत्या शहरीकरणामुळे हवामान बदलाच्या गंभीर परिणामांना सामोरे जात आहे. वाढते तापमान, हरित क्षेत्रातील घट, वारंवार येणारे पूर, वायुप्रदूषण तसेच समुद्रपातळी वाढीचा धोका यामुळे प्रदेशाची पर्यावरणीय व सामाजिक लवचिकता कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महानगर प्रदेश नागरी पायाभूत सुविधा सुधारणा कार्यक्रम (MMRUIIP), KfW, जर्मन बँकेच्या सहकार्याने हाती घेण्यात आला आहे.

निसर्गाधारित उपाययोजना, संसाधन कार्यक्षमता व शाश्वत शहरी नियोजनासाठी हवामान अनुकूल निळा-हिरवा पायाभूत सुविधा, एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन, वेस्ट-टू-एनर्जी व सर्क्युलर इकॉनॉमी, उर्जा कार्यक्षमता व नवीकरणीय उर्जेचे एकत्रीकरण, शाश्वत गतीशिलता, कार्बन फूटप्रिंट कमी करणे, शहरी उष्णता कमी करणे, वायू गुणवत्ता सुधारणा व मुंबई हवामान सप्ताह हे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

यासाठी भारत सरकार व KfW यांच्यात युरो १०० दशलक्ष (रु. ८५० कोटी) कर्ज व युरो २.२ दशलक्ष (रु. १९ कोटी) अनुदान करार दिनांक १८ डिसेंबर २०२३ करण्यात आला आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. २५० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

## ५) पायाभूत सुविधा प्रकल्प

- **ठाणे शहरातील रायलादेवी तलाव सुशोभिकरण टप्पा-२ चे काम**

  रायलादेवी तलाव सुशोभिकरण टप्पा २ अंतर्गत एकूण क्षेत्रफळ १९.३४ चौ.मी. परिसराचा विकास करण्यात येणार असून प्रशासकीय मान्यता रु.१३०.६४ कोटी इतकी आहे. यामध्ये नागरिकांना सभागृह, क्रिडासंकुल, विश्राम गृह, कार्यालयीन इमारत, नौकाविहार, लाईफ गार्ड टॉवर, विसर्जन सुविधा उपलब्ध होणार आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. ८० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **ठाणे शहरातील येऊर डोंगराच्या पायथ्याशी रस्त्याचे काम**

  सदर रस्त्याची लांबी ११.८५ कि.मी. असून प्रशासकीय मान्यता रु. ४८१ कोटी इतकी आहे. सदर रस्त्यामुळे पश्चिम उपनगर, पालघरकडे जाणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. शहरातील वाहतूक कोंडी मोठया प्रमाणात कमी होईल. तसेच इंधन व वेळेची बचत होईल. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु.५० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **ठाणे शहरातील मासुंदा तलावाचे सुशोभिकरण**

  सदर प्रकल्पांतर्गत मासुंदा तलाव परिसरात लँडस्केपिंग, फुड कोर्ट इत्यादी सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच अस्तित्वातील उद्यान व मोकळया जागेचे सुयोग्य थीमनुसार सुशोभिकरण, लेझर शो, म्युझिकल कारंजे, विद्युत रोषणाई इत्यादी कामे करण्यात येणार आहे. सदर सुशोभिकरणाची प्रशासकीय मान्यता रु. ६० कोटी इतकी आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. ४० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **कोलशेत ते काल्हेर खाडीपुलाचे संकल्पन व बांधकाम करणे**

  सदर प्रकल्पाची लांबी २.३ कि.मी. असून प्रशासकीय मान्यता रु. ५४४ कोटी इतकी आहे. या प्रकल्पामुळे भिवंडी मार्गावरील वाहतूकीचा प्रश्न सुटणार आहे. तसेच ठाणे येथून भिवंडीकडे जाण्याचे अंतर ७ ते ८ मिनिटात पूर्ण होणार आहे. यामुळे कोलशेत व काल्हेर ही दोन्ही गावे जोडली जाणार आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. ९४.११ कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **ठाणे कोस्टल रोड टप्पा-२, खारेगांव ते आनंद नगर, कोपरीपर्यंत**

  सदर प्रकल्पाची लांबी ७.४० कि.मी. असून प्रशासकीय मान्यता रु. १२२९ कोटी इतकी आहे. या प्रकल्पामुळे ठाणे शहरातील प्रमुख चौकांवरील वाहतूक कोंडीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होणार असून मालवाहतूक वाहनांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. २५० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

## ६) मेट्रो प्रकल्प

- **मेट्रो मार्गिका ५ चा टप्पा-२ (भिवंडी-कल्याण)**
- सदर मार्गिकेची लांबी १०.४८ कि.मी. असून मार्गिकेवर एकूण ६ स्थानके आहेत. प्रकल्पाची किंमत रु.७३२६.१३ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. १३०९.३० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.
- **मेट्रो मार्गिका ५ चा विस्तार - (मेट्रो मार्गिका ५अ) दुर्गाडी ते कल्याण व उल्हासनगर**

सदर मार्गिकेची लांबी ११.८३ कि.मी. असून मार्गिकेवर एकूण ७ स्थानके आहेत. प्रकल्पाची किंमत रु.४०६३ कोटी इतकी आहे. सदर मार्गिकेचा विस्तार दुर्गाडी ते कल्याण व उल्हासनगर पर्यंत करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. १८३.३५ कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

- **मेट्रो मार्गिका १३ - शिवाजी चौक, मिरारोड ते विरार**

  सदर मार्गिका शिवाजी चौक, मिरारोड ते विरार पर्यंत प्रस्तावित असून प्रकल्पाचा सविस्तर अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. २०० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे

- **मेट्रो मार्गिका १४ - कांजूरमार्ग ते बदलापूर**

  सदर मार्गिका कांजूरमार्ग ते बदलापूर पर्यंत प्रस्तावित असून प्रकल्पाचा सविस्तर अहवाल बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. याकरीता आगामी अर्थसंकल्पात **रु. ५०० कोटीची तरतूद** करण्यात आली आहे.

## ड) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात पूर्ण होणारे महत्वाचे प्रकल्प

### १. पायाभूत सुविधा प्रकल्प

- **शिवडी वरळी उन्नत मार्ग प्रकल्प**

  सदर उन्नत मार्ग हा ४ पदरी असून त्याची लांबी ५.९६४ कि.मी. आहे आणि प्रशासकीय मान्यता रु.२२८३.५३ कोटी आहे. या प्रकल्पामुळे अटल सेतू - वांद्रे वरळी सागरी सेतू आणि सागरी किनारा मार्ग प्रकल्पांशी थेट जोडला जाणार आहे. हा उन्नत मार्ग पूर्णपणे सिग्नल फ्रि असून नवी मुंबई व दक्षिण मुंबई असा प्रवास सहज, जलद होऊन वेळेची व इंधनाची बचत होणार आहे.

- **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक**

  या भव्य स्मारकाची प्रशासकीय मान्यता रु. १०८९ कोटी आहे. यात प्रामुख्याने स्मारकाची उंची ४५० फुट, १००० आसनाची क्षमता असलेले प्रेक्षागृह, संशोधन केंद्र, व्याख्यान वर्ग, ग्रंथालय, ध्यान केंद्र, वाहनतळ, प्रवेश द्वार इमारतीत माहिती सेंटर, स्मरणिका कक्ष, तिकीट घर, लॉकर रूम, सुरक्षा काऊंटर, नियंत्रण कक्ष इत्यादी बाबींचा समावेश आहे.

  या स्मारकामुळे मानवतावादी विचारांचा जागतिक प्रचार होण्यास मदत होऊन मुंबईचे राष्ट्रीय व सामाजिक महत्व वाढणार आहे. सदर स्मारक मुंबईचे नवे आंतरराष्ट्रीय ओळखस्थान व पर्यटन आकर्षण ठरणार आहे. यामुळे पर्यटन रोजगार संधी, परिसरातील विकास वाढ होणार आहे.

  सदर स्मारक मानवता धर्माचे प्रेरणा स्थान व शांततेचा अनुभव देणारे ठरेल.

- **महापौर मुंबई निवासस्थानाच्या परिसरात स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक**

  सदर स्मारकासाठी शासन निर्णय दिनांक १६/०३/२०२१ च्या अन्वये टप्पा -१ करीता रु. २५० कोटी व टप्पा-२ करीता रु. १५० कोटी असे एकूण रु. ४०० कोटी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. टप्पा-१ चे प्रत्यक्ष बांधकाम व पायाभूत सेवांची कामे माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच टप्पा-२ मध्ये हार्डवेअर आणि सहाय्यभूत सेवा, तंत्रज्ञान, लेझर शो, डिजिटल मॅपिंग प्रोजेक्शन, कथा /

गोष्टी सांगणे, चित्रपट, व्हर्च्यूअल रियालिटी, ऑडिओ व्हिजुअल आणि तांत्रिक घटक इत्यादी कामांचा समावेश आहे.

सन २०२६ हे स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे जन्म शताब्दी वर्ष साजरे होत असल्याकारणाने सदर स्मारक आगामी वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे

- **मुंबई पारबंदर ते मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाचे बांधकाम**

  सदर प्रकल्प ६ पदरी पुलाचा असून त्याची लांबी ६.३३५ कि.मी. आहे. त्याची प्रशासकीय मान्यता रु. १४२० कोटीची आहे. या प्रकल्पामुळे मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग जोडले जाणार आहेत. तसेच यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला विद्यमान पायाभूत सुविधांशी जोडण्यासाठी डिझाईन केलेल्या रस्त्याच्या जाळ्यातील चिर्ले आणि पळस्पे विभाग हे महत्वाचे बिंदू ठरणार आहेत. या प्रकल्पामुळे नवी मुंबई परिसराचा झपाट्याने विकास होऊन व्यापार उदीम वाढण्यास मदत होईल.

- **तळोजा-एम.आय.डी.सी. ते राष्ट्रीय महामार्ग -४ रस्त्याचे बांधकाम-भाग १**

  सदर डी.पी. रस्त्याची लांबी सुमारे ३.२६ कि.मी. असून सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग ४ आणि तळोजा औद्योगिक वसाहत (MIDC) यांना जोडणार आहे. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रु. १५१.२१ कोटी आहे. सदर प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन वेळेची आणि इंधनाची बचत होणार आहे. तसेच परिसरातील उद्योग वाढीस चालना मिळेल.

- **कल्याण बाह्य वळण रस्ता भाग-३ व ४ चे उर्वरीत काम आणि भाग-८ रस्त्याचे संकल्पन आणि बांधकाम**

  सदर प्रकल्पाची संपूर्ण लांबी ३१.५० कि.मी. असून एकूण प्रशासकीय मान्यता रु.७०१.२१ कोटी आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयानुसार हा प्रकल्प बदलापूर-कटाई रस्त्यावरील हेदूटणे गावापासून पुढे कल्याण शिळ रस्त्यास माणगाव येथे मध्य रेल्वेवरील कोपर स्थान, वसई-दिवा लोह मार्गास, गावदेवी गावाजवळ छेदून ठाकुर्ली, दुर्गाडी पुलापासून उल्हास/काळू नदीस समांतर टिटवाळा पर्यंत आहे. प्रकल्पामुळे कल्याण-डोंबिवली शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर होणार आहे.

- **कल्याण विकास केंद्र प्रकल्पातील उसरघर-निळजे-घेसर, निळजे-कोळे-हेदूटणे, हेदूटणे-माणगाव-भोपर आणि उसरघर-घारीवली या गावांना जोडणाऱ्या चार रस्त्यांचे बांधकाम भाग १ ते ३**

  महाराष्ट्र शासनाने दि. ०९/०८/२००६ रोजी अधिसूचनेद्वारे प्राधिकरणाची ठाणे जिल्ह्यातील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली असून त्याचे क्षेत्रफळ १०८९ हेक्टर इतके आहे. यापैकी १० गांवासाठी कल्याण ग्रोथ सेंटर अंतर्गत टाऊन प्लॅनिंग जाहिर करण्यात आले आहे. या कामा अंतर्गत कल्याण ग्रोथ सेंटरमध्ये ४ नवीन काँक्रीट डी.पी. रस्त्याचे बांधकाम करण्यात येत आहे. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रु. १०८९ कोटी इतकी आहे. हे रस्ते डोंबिवली, अंबरनाथ, तळोजा आणि पनवेल एमआयडीसीशी जोडणी साधतील.

- **ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ओवळा माजिवडा येथील विविध रस्त्यांची कामे**

  सदर प्रकल्पांतर्गत ओवळा माजिवडा येथील एकूण २३ रस्त्यांचे रुंदीकरण व मजबूतीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे आंतरिक रस्ते तसेच अपूर्ण भागाला जोडणारे रस्ते यांची जोडणी होऊन घोडबंदर रस्त्यावरील

वाहतूकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. सदर प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रु.७०३.३४ कोटी इतकी आहे.

- **उल्हासनगर महानगर क्षेत्रातील सिंमेंट काँक्रीट रस्त्यांची बांधकामे भाग-१, २, ३**

  सदर प्रकल्पातील भाग १,२ व ३ रस्त्यांची लांबी ७.७८ कि.मी. असून प्रकल्पाची एकूण प्रशासकीय मान्यता रु.१५१.६० कोटी इतकी आहे. सदर प्रकल्पामुळे उल्हासनगर ते अंबरनाथ ही शहरे जोडली जाणार आहेत. सदर प्रकल्पामुळे जलद वाहतूक, खड्डे मुक्त रस्ते, कमी प्रदुषण आणि देखभाल खर्चात कपात होणार आहे.

**२. मेट्रो प्रकल्प**

- **मेट्रो मार्गिका २ब (डी. एन. नगर - मंडाळे) टप्पा-१अ डायमंड गार्डन ते चेंबूर**

  मेट्रो मार्गिका २ब चा टप्पा-१अ डायमंड गार्डन ते चेंबूर असून त्याची लांबी ०.३७ कि. मी. आहे. यामध्ये एका स्थानकाचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु. १५० कोटी असून आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका २ब (डी. एन. नगर - मंडाळे) टप्पा-२ डी. एन. नगर ते सारस्वत नगर**

  मेट्रो मार्गिका २ब चा टप्पा-२ डी. एन. नगर ते सारस्वत नगर असून त्याची लांबी ६.७ कि. मी. आहे. यामध्ये ६ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु. २७४८ कोटी असून आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका २ब (डी. एन. नगर - मंडाळे) टप्पा-३ सारस्वत नगर - चेंबूर**

  मेट्रो मार्गिका २ब चा टप्पा-३ सारस्वत नगर - चेंबूर असून त्याची लांबी १०.९ कि. मी. आहे. यामध्ये ७ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु. ४४५७ कोटी असून आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ४ (वडाळा - कासारवडवली) टप्पा-१ कासारवडवली ते कॅडबरी जंक्शन**

  मेट्रो मार्गिका ४ चा टप्पा -१ कासारवडवली ते कॅडबरी जंक्शन असून त्याची लांबी ७.८ कि.मी. आहे. यामध्ये ८ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु.१४५४९ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्प आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ४ (वडाळा - कासारवडवली) टप्पा-२ कॅडबरी जंक्शन ते गांधीनगर**

  मेट्रो मार्गिका ४ चा टप्पा-२ कॅडबरी जंक्शन ते गांधीनगर असून त्याची लांबी १०.५ कि. मी. आहे. यामध्ये ११ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु. ४२८१ कोटी असून आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ४अ (कासारवडवली - गायमुख)**

  मेट्रो मार्गिका ४अ हा कासारवडवली ते गायमुख असून त्याची लांबी २.७ कि.मी. आहे. यामध्ये २ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु.९४९ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्प आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ६ (स्वामी समर्थ नगर - विक्रोळी)**

  मेट्रो मार्गिका ६ स्वामी समर्थ नगर - विक्रोळी असून त्याची लांबी १४.५ कि. मी. आहे. यामध्ये १३ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु. ६७१६ कोटी असून आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- **मेट्रो मार्गिका ९ (दहिसर पूर्व - मिरा-भाईंदर) टप्पा-२ काशीगाव ते मिरा-भाईंदर**

  मेट्रो मार्गिका ९ टप्पा-२ काशीगाव ते मिरा-भाईंदर असून त्याची लांबी ५.८ कि. मी. आहे. यामध्ये ४ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत रु. ९३२ कोटी असून आगामी वर्षात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**प्रकल्पासाठी निधी**

प्राधिकरणाकडे स्वत:चे कोणतेही कायमस्वरूपी व प्रवाही आर्थिक स्त्रोत नाही ही बाब लक्षात घेऊन मेट्रो प्रकल्प मंजूर करताना राज्य शासनाने वेळोवेळी काही आदेश निर्गमित केले आहेत व त्यानुषंगाने दरमहा / दरवर्षी काही उत्पन्न प्राधिकरणास येणे अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत प्राधिकरणाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने प्राधिकरण पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी विविध संस्थांकडून कर्ज घेऊन प्रकल्प पूर्ण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. प्राधिकरणासाठी नविन उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे अथवा शासनाच्या अर्थसंकल्पातून अर्थसहाय्य उपलब्ध होणे गरजेचे आहे. मेट्रो प्रकल्प मंजूर करताना शासनाने काही उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केलेले आहेत. यामध्ये खालील घटक समाविष्ट आहेत.

**अ) मुद्रांक शुल्क :** शासन अधिसूचना दिनांक ०८/०२/२०१९ पासून मुंबई व ठाणे महानगर परिसर क्षेत्रात व अधिसूचना दिनांक २६/०६/२०१९ रोजी पासून भिवंडी, कल्याण व मिरा - भाईंदर (क्षेत्रासाठी मुद्रांक शुल्कामध्ये १% वाढ केली आहे) कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर माहे एप्रिल, २०२० ते माहे मार्च, २०२२ पर्यंत ही वाढ थांबविण्यात आली व दि. १ एप्रिल, २०२२ पासून ही १% वाढ मेट्रो सेस म्हणून पुन:श्च लागू केली आहे. शासनाकडून माहे जून, २०२५ अखेरपर्यंत रु. ९८१३.६१ कोटी इतकी रक्कम येणे अपेक्षित होती. या बाबत शासनास पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. आज रोजीपर्यंत रु. ४४१९.७२ कोटी प्राप्त झाले आहेत. सन २०२६-२७ मध्ये या स्त्रोतामधून रु.४३६८.४२ कोटी प्राधिकरणास येणे अपेक्षित आहे.

**ब) विकास आकार :** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ (ब) मधील उप कलम (२-१ अ), मध्ये केलेल्या दिनांक २५/०८/२०१५ रोजीच्या सुधारणेनुसार महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या दिनांकापासून प्रचलित विकास शुल्कामध्ये १००% वाढ करणे व जमा झालेले वाढीव विकास शुल्क निकडीचे नागरी परिवहन प्रकल्प राबविणाऱ्या संस्थेकडे वर्ग करावयाचे आहे. आतापर्यंत विकास शुल्कापोटी प्राधिकरणास एकूण रु.३०२५.०० कोटी प्राप्त झाले आहे. सन २०२६-२७ मध्ये या स्त्रोतामधून रु.२००० कोटी प्राधिकरणास येणे अपेक्षित आहे.

**क) परिवहन केंद्रित विकास (TOD) :** मेट्रो मार्गिकेच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंतच्या जमिनीवर अधिमूल्य आकारून अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) प्रदान करून त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित नियोजन प्राधिकरणाने वसूल करून अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम मुंबई महानगर प्रदेश

विकास प्राधिकरणाकडे वर्ग करावयाची मान्यता महाराष्ट्र शासनाने सर्व मेट्रो प्रकल्पाच्या शासन निर्णयामध्ये नमूद केली आहे. त्यानुसार शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत परिवहन केंद्रित विकास व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) ची तरतूद करण्याचा निर्णय देणे अपेक्षित आहे. सदर तरतूदीमुळे प्राधिकरणास दरवर्षी अंदाजे रु. १,५०० कोटी मिळणे अपेक्षित आहे. याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

**<u>ड) प्राधिकरणास येणे असलेल्या इतर रक्कमांचा तपशील : -</u>** शासनाच्या आदेशानुसार प्राधिकरणाने सन १९९५ ते सन २००० या कालावधीत विविध शासकीय संस्था यांच्याकडे ठेवी ठेवलेल्या होत्या. तथापि, काही संस्थानी मुदत ठेवी मुदतीनंतर परत केलेल्या नाहीत. तसेच त्यावरील व्याजही प्रदान केलेले नाही. माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत मुद्दल आणि व्याज मिळून सुमारे रु. २८२१.८१ कोटी येणे आहे. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांचेकडून कर्ज व व्याजापोटी रु. ५०५.०० कोटी व मुंबई नागरी विकास प्रकल्प फिरता निधी अंर्तगत कर्ज रु.११८८.७१ कोटी आणि त्यावरील व्याज रु. ६१९.६९ कोटी इतकी थकबाकी येणे आहे.

प्राधिकरणाने आगामी वर्षाचा अर्थसंकल्पात विकास प्रकल्प आणि योजनांसाठी रु. ४४,२७७.९३ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद केली आहे. सबब प्राधिकरणास उपरोक्त निधी प्राप्त झाल्यास विकास प्रकल्प आणि योजना यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे शक्य होईल.

विकासाचा उत्सव साजरा करीत असताना महानगरातील नागरीकांना मेट्रो मार्गिका २अ व ७ सेवेत दाखल करण्यात आल्या असून दररोज ३ लाख प्रवासी या सेवेचा लाभ घेत असून प्रतिदिन अंदाजे रु.४० लाख इतका महसूल प्राप्त होत आहे.

अटल बिहारी वाजपेयी-शिवडी न्हावा शेवा अटल सेतू (MTHL) प्रकल्पाचा दररोज अंदाजे २३,००० वाहने वापर करत असून प्रतिदिन अंदाजे रु. ६३ लाख इतका महसूल प्राप्त होत आहे.

वांद्रे कुर्ला संकुल जोड रस्ता, सांताक्रुज चेंबूर जोडरस्ता प्रकल्पातील केबल स्टे पुल, ऐरोली कटाई नाका ते ठाणे बेलापूर रस्त्यावरील भारत बिजली मार्गिका, एकात्मिक तिकीट प्रणाली यांचे लोकार्पण यासारख्या सुविधा उपलब्ध केल्याने समाधानाची भावना आहे. त्यामुळे नागरिकांचा प्रवास सुकर, जलद व आरामदायी होण्यास मदत झालेली आहे.

सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमुळे नागरिकांना स्वच्छ, मुबलक आणि शाश्वत पाणी पुरवठा होत आहे. या योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगर पालिकेतील जवळपास १४ लाख लोकसंख्येस पाणी पुरवठा होत असून दरमहा अंदाजे ६ कोटी इतका महसूल प्राप्त होत आहे.

प्राधिकरणाच्या सर्वांगिण नियोजित शहरीकरणामुळे सेवा क्षेत्र, औद्योगिक, पर्यटन क्षेत्रामध्ये रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे आर्थिक वृध्दीस चालना मिळून ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दीष्टे साध्य होणार आहे.

हरित मुंबई महानगर प्रदेश विकास उद्देशाने पर्यावरण पूरक उपाय योजनांतर्गत प्रदेशाचा समतोल विकास साधण्याचा प्राधिकरणाचा दृष्टीकोन आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय व मा. उप मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या नेतृत्वाखाली प्राधिकरण उल्लेखनीय कामगिरी करीत आहे. तसेच त्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभारी आहे. तसेच प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांचे देखील मी आभार मानतो. तरी कृपया प्राधिकरणाचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**<u>प्रस्ताव :</u>**

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम १९७६ मधील नियम ४ अन्वयें मुंबई महानगर प्रदेश विकास (मुंमप्रवि) निधीचे २०२६-२७ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२५-२६ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यात येत आहे. सन २०२६-२७ या वर्षात अंदाजित जमा रु.४८,०७२.५७ कोटी व खर्च रु.४८,०७२.४० कोटी इतका अपेक्षित आहे. तरी सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प तसेच अर्थसंकल्पात नमूद करण्यात आलेल्या प्रकल्प / योजना मंजूरीकरीता सादर करण्यात येत आहे.

२) मुंबई नागरी विकास प्रकल्प (MUDP) - फिरता निधीचे अंदाजित जमा रु.२०१.८२ कोटी व खर्च रु.५.०० कोटी आणि महानगर योजना (MEGACITY) - फिरता निधीचे अंदाजित जमा रु.२९१.०० कोटी व खर्च रु.४१२.९२ कोटी दर्शविणारे सन २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२५-२६ चे सुधारीत अंदाज देखील मंजूरी करता सादर करण्यात येत आहे.

तरी प्राधिकरणास विनंती करण्यात येते की, वर नमूद केलेल्या प्रस्तावांचा कृपया विचार करावा आणि ते मान्य असल्यास पुढील ठराव मंजूर करण्यात यावेत अशी विनंती आहे.

**<u>ठराव :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम १९७६ मधील नियम ४ अन्वयें प्राधिकरणाचे सन २०२६-२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजित जमा रु. ४८,०७२.५७ कोटी व खर्च रु. ४८,०७२.४० कोटी व सन २०२५-२६ वर्षाचे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज तसेच अर्थसंकल्पात नमूद करण्यात आलेल्या प्रकल्प / योजनांना मान्यता देण्यात येत आहे."

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सन २०२६-२७ चे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अर्थसंकल्पीय अंदाजित जमा रु. २०१.८२ कोटी व खर्च रु. ५.०० कोटी आणि महानगर योजना – फिरता

निधी यांचे अर्थसंकल्पीय अंदाजित जमा रु.२९१.०० कोटी व खर्च रु.४१२.९२ कोटी व सन २०२५-२६ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करण्यात येत आहे."

"**आणखी असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की,** उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत."

प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

***************

# अर्थसंकल्पीय अंदाज

# २०२६-२७

## (सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ सह)

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**वार्षिक अर्थसंकल्प २०२६-२७**

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त अर्थसंकल्प २०२६-२७ | १ |
| २ | भाग - १ (जमा) | २ |
| ३ | जमिनीची विक्री | ३ |
| ४ | प्रकल्प संचालन महसुल | ३ |
| ५ | भू-भाडे, व्याज इत्यादी रकमा | ४ |
| ६ | शासनाचे अनुदान व विकास हक्क हस्तांतरण इ. | ४ |
| ७ | नागरी परिवहन निधी (UTF) | ५ |
| ८ | राज्य शासनाकडून पायाभूत प्रकल्पांसाठी दुय्यम कर्ज | ५ |
| ९ | कर्जाऊ घेतलेल्या रकमा | ६ |
| १० | भाग - २ (खर्च) | ७ |
| ११ | सामान्य प्रशासनावरील खर्च आणि अग्रीम व कर्जे | ८ |
| १२ | प्रकल्प देखभाल व संचालन खर्च | १० |
| १३ | इसारा रकमा परतफेड | १० |
| १४ | सर्वेक्षणे, अभ्यास तरतुदींचा तपशिल | ११ |
| १५ | पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अनुदाने | १२ |
| १६ | विकास प्रकल्प व योजनांसाठी तरतुद | १३ |
| १७ | कर्जाऊ मुद्दल रकमेची परतफेड | १९ |
| १८ | कर्जाऊ रकमेवरील व्याज व इतर शुल्क | २० |
| १९ | मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी (MUDP) | २१ |
| २० | मेगा सिटी - फिरता निधी (Mega City) | २२ |

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**

**सन २०२५-२६ चे सुधारीत व सन २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज**

(रुपये कोटी)

| तपशिल | प्रत्यक्ष | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | सुधारीत अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | | | |
| **जमा** | | | | | | |
| १. जमिनीची विक्री (अनुसूची-अ / पृष्ठ क्र.३) | १२६०.७१ | १०५१.४० | २५१२.६६ | ७३४४.०० | ४५८२.६२ | ११,१७७.९५ |
| २. प्रकल्प संचालन महसुल (अनुसूची-ब / पृष्ठ क्र.३) | ७.५० | २०५.६५ | ३४२.४५ | ३०५.२७ | २३८.३० | ४४१.७१ |
| ३. भू भाडे, व्याज, इत्यादी रकमा (अनुसूची-क / पृष्ठ क्र.४ ) | १०५६.०६ | ९३८.९९ | ३१५४.६५ | ८५६.०७ | १४१९.११ | १,६६४.१९ |
| ४. शासनाचे अनुदान व विकास हक्क हस्तांतरण (अनुसूची-ड / पृष्ठ क्र.४) | ५८४.५० | १९६.२२ | २५३.२६ | १०२४.०० | १०७४.३६ | १,१८९.१४ |
| ५. नागरी परिवहन निधी (UTF) (अनुसूची-इ / पृष्ठ क्र.५) | ४००.०० | २६४५.१२ | २४१५.५८ | ३०००.०० | ४४५०.०० | ६,३६८.४२ |
| ६. राज्य शासनाकडून पायाभुत प्रकल्पांसाठी दुय्यम कर्ज (अनुसूची-फ / पृष्ठ क्र.५) | ३३३.०० | ६२९.५० | ५४१.४० | २०८२.०० | ३००२.८२ | ३,५२०.०० |
| ७. कर्जाऊ घेतलेल्या रकमा (अनुसूची-ग / पृष्ठ क्र.६) | ८७४७.०७ | ९३९६.२५ | १०००९.०७ | २२३२७.३५ | १५५४८.१७ | २३,७११.१६ |
| **एकूण जमा** | **१२,३८८.८४** | **१५,०६३.१३** | **१९,२२९.०६** | **३६,९३८.६९** | **३०,३१६.१८** | **४८,०७२.५७** |
| **खर्च** | | | | | | |
| १. सामान्य प्रशासनावरील खर्च आणि अग्रीम व कर्जे (अनुसूची - १ / पृष्ठ क्र. ८ व ९) | २५२.३५ | २६०.६६ | २९९.७१ | ३८४.९५ | ३९२.५० | ४१०.५९ |
| २. प्रकल्प देखभाल व संचालन खर्च (अनुसूची - २ / पृष्ठ क्र. १०) | ४२१.७७ | ५०७.१२ | २९२.२१ | ६१९.९५ | ५२५.७८ | ७९६.२४ |
| ३. इसारा व अनामत रकमा परतफेड (अनुसूची -३ / पृष्ठ क्र. १०) | ३०४.९६ | ३०१.६८ | ५६४.४६ | १०१.०० | ४००.०० | ४०१.०० |
| ४. सर्वेक्षणे, अभ्यास यासाठी तरतूद (अनुसूची - ४ / पृष्ठ क्र. ११) | ९.७० | ५.४९ | ११.७५ | ३३६.६५ | ८५.६२ | २४५.७८ |
| ५. पायाभुत सुविधा प्रकल्पांसाठी अनुदाने (अनुसूची - ५ / पृष्ठ क्र. १२) | १०२.७५ | १६०.२४ | ३४६.०२ | २९९.७५ | ३५६.३८ | २३९.५७ |
| ६. विकास प्रकल्प व योजनांसाठी तरतूद (अनुसूची - ६/ पृष्ठ क्र. १३ ते १८) | १३२०३.२७ | १२०६३.२० | १२७९०.४९ | ३५१५१.१४ | २६६५७.३३ | ४२०२६.१४ |
| ७. कर्जाऊ मुद्दल रक्कमेची परतफेड (अनुसूची - ७ / पृष्ठ क्र.१९) | ०.०० | ०.०० | १११.७० | ४८८.६० | ७७१.१३ | ७०५.४८ |
| ८. कर्जाऊ रकमेवरील व्याज व इतर शुल्क (अनुसूची - ८ / पृष्ठ क्र.२०) | ६६.६२ | ६३४.५३ | १३१०.८० | २८०५.३७ | २१२४.३९ | ३२४७.६० |
| **एकूण खर्च** | **१४,३६१.४२** | **१३,९३२.९२** | **१५,७२७.१४** | **४०,१८७.४१** | **३१,३१३.१३** | **४८,०७२.४०** |
| **अधिक्य / तूट ( + / - )** | **-१,९७२.५८** | **१,१३०.२१** | **३,५०१.९२** | **-३,२४८.७२** | **-९९६.९५** | **०.१७** |
| **तूट - बँक ठेवी/अतिरिक्त जमिन विक्री/शासन अर्थसहाय्यामधून भागविण्याचे प्रस्तावित आहे** | **१,९७२.५८** | -- | -- | **३,२४८.७२** | **९९६.९५** | -- |


जमा
जमिनीची विक्री, ₹ ११,१७८, २३%
प्रकल्प संचालन महसुल, ₹ ४४२, १%
भू भाडे,व्याज, इत्यादी रकमा, ₹ १,६६४, ४%
शासनाचे अनुदान व विकास हक्क हस्तांतरण, ₹ १,१८९, ३%
नागरी परिवहन निधी (UTF), ₹ ६,३६८, १३%
राज्य शासनाकडून पायाभुत प्रकल्पांसाठी दुय्यम कर्ज, ₹ ३,५२०, ७%
कर्जाऊ घेतलेल्या रकमा, ₹ २३,७११, ४९%


खर्च
सामान्य प्रशासनावरील खर्च आणि अग्रीम व कर्जे, ₹ ४११, १%
प्रकल्प देखभाल व संचालन खर्च, ₹ ७९६, २%
इसारा व अनामत रकमा परतफेड, ₹ ४०१, १%
सर्वेक्षणे, अभ्यास यासाठी तरतूद, ₹ २४६, १%
कर्जाऊ रकमेवरील व्याज व इतर शुल्क, ₹ ३,२४८, ७%
पायाभुत सुविधा प्रकल्पांसाठी अनुदाने, ₹ २४०, ०%
कर्जाऊ मुद्दल रक्कमेची परतफेड, ₹ ७०५, १%
विकास प्रकल्प व योजनांसाठी तरतूद, ₹ ४२,०२६, ८७%

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
## सन २०२५-२६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२६-२७ चे मूळ अर्थसंकल्प
### भाग - १ (जमा)

(रुपये कोटी)

| अ. क्र. | तपशिल | प्रत्यक्ष | | | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारीत अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२५-२६ | २०२६-२७ |
| १ | जमिनीची विक्री (अनुसूची-अ / पृष्ठ क्र.३) | १२६०.७१ | १०५१.४० | २५१२.६६ | ७३४४.०० | ४५८२.६२ | ११९७७.९५ |
| २ | प्रकल्प संचालन महसुल (अनुसूची-ब / पृष्ठ क्र.३) | ७.५० | २०५.६५ | ३४२.४५ | ३०५.२७ | २३८.३० | ४४१.७१ |
| ३ | भू भाडे, व्याज, इत्यादी रकमा (अनुसूची-क / पृष्ठ क्र.४) | १०५६.०६ | ९३८.९९ | ३१५४.६५ | ८५६.०७ | १४१९.९१ | १६६४.१९ |
| ४ | शासनाचे अनुदान व विकास हक्क हस्तांतरण (अनुसूची-ड / पृष्ठ क्र.४) | ५८४.५० | १९६.२२ | २५३.२६ | १०२४.०० | १०७४.३६ | ११८९.१४ |
| ५ | नागरी परिवहन निधी (UTF) (अनुसूची-इ / पृष्ठ क्र.५) | ४००.०० | २६४५.१२ | २४१५.५८ | ३०००.०० | ४४५०.०० | ६३६८.४२ |
| ६ | राज्य शासनाकडून पायाभुत प्रकल्पांसाठी दुय्यम कर्ज (अनुसूची-फ / पृष्ठ क्र.५) | ३३३.०० | ६२९.५० | ५४१.४० | २०८२.०० | ३००२.८२ | ३५२०.०० |
| ७ | कर्जाऊ घेतलेल्या रकमा (अनुसूची-ग / पृष्ठ क्र.६) | ८७४७.०७ | ९३९६.२५ | १०००९.०७ | २२३२७.३५ | १५५४८.१७ | २३७११.१६ |
| | **एकूण :** | **१२,३८८.८४** | **१५,०६३.१३** | **१९,२२९.०६** | **३६,९३८.६९** | **३०,३१६.१८** | **४८,०७२.५७** |

## जमिनीची विक्री

अनुसूची - अ

(रुपये कोटी)

| अ. क्र. | तपशिल | प्रत्यक्ष | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | सुधारीत अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | | | |
| १ | वांद्रे - कुर्ला संकुल (अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासह) | १२३६.५६ | ९२३.४० | २१२५.१५ | ७३१४.०० | ४४३६.०६ | ५५३४.९५ |
| २ | ओशिवरा जिल्हा विकास केंद्र आणि ठाणे परिसरातील जमिनीचे विकास आकार व पडताळणी शुल्क | २४.१५ | २७.८४ | ५९.७३ | ३०.०० | १४६.१२ | १३.०० |
| ३ | वडाळा ट्रक टर्मिनल व वडाळा अधिसूचित क्षेत्र (Wadala Notified Area (WNA)) | ०.०० | १००.१६ | ३२७.७८ | ०.०० | ०.४४ | १६३०.०० |
| ४ | के. एस.सी. (कर्नाळा-साई-चिरनेर) नवनगर प्रकल्प -NTDA | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ४०००.०० |
| | **एकूण :** | **१,२६०.७१** | **१,०५१.४०** | **२,५१२.६६** | **७,३४४.००** | **४,५८२.६२** | **११,१७७.९५** |

## प्रकल्प संचालन महसुल

अनुसूची - ब

(रुपये कोटी)

| अ. क्र. | तपशिल | प्रत्यक्ष | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | सुधारीत अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | | | |
| १ | भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी -शिवडी न्हावा शेवा अटल सेतू (MTHL) | ०.०० | ३२.२६ | १८२.११ | १६०.०० | १६०.०० | ३१०.०० |
| २ | सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा, मेट्रो २अ व ७ आणि मोनो रेल महसुल | ७.५० | १७३.३९ | १६०.३४ | १४५.२७ | ७८.३० | १३१.७१ |
| | **एकूण :** | **७.५०** | **२०५.६५** | **३४२.४५** | **३०५.२७** | **२३८.३०** | **४४१.७१** |

## भू भाडे, व्याज, इत्यादी रकमा

अनुसूची - क
(रुपये कोटी)

| अ. क्र. | तपशिल | प्रत्यक्ष | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | सुधारीत अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | | | |
| १ | ठेवी, बचत खात्यावरील व्याज | ९२.११ | ६८.१३ | २३२.०९ | २००.०० | २९३.८३ | ३५८.०० |
| २ | नगर परिषद, महानगरपालिका इत्यादींकडून कर्जाची परतफेड | १७६.७९ | १०८.८१ | ८८.२३ | ९७.१५ | ९७.९४ | ९५.०५ |
| ३ | नगर परिषद, महानगरपालिका, इत्यादींना दिलेल्या कर्जावरील व्याज | ५३.६४ | ६१.५० | ३५.०५ | ३०.९० | ३५.०९ | २३.०३ |
| ४ | संकीर्ण जमा रक्कमा, विकास आकार, झोपडपट्टी पुनर्वसन योजना ठेवी व पायाभूत सोयी सुविधा शुल्क | ४८७.९९ | १९३.९० | १,९७०.०८ | २६३.०० | १५३.३६ | ४७९.३० |
| ५ | सुरक्षा ठेवी, इसारा व अनामत ठेवी | १७६.०० | ४३०.५० | ७३२.६८ | १००.०० | ७६९.५७ | ५४६.०० |
| ६ | जमीन, गाळे, वाहनतळ, भाडेपट्टी आकार, हॉकर्स झोनचे भाडे, बॅकबे पार्कींग भाडे व भुई भाडे व छाननी आकार | ६९.५३ | ६९.१३ | ८२.५५ | १५४.५० | ६२.९७ | १४९.८८ |
| ७ | जाहिरातीमधून उत्पन्न - स्कायवॉक व बस क्यु शेल्टर | ०.०० | ७.०२ | १३.९७ | १०.५२ | ७.१५ | १२.९३ |
| | **एकूण :** | **१,०५६.०६** | **९३८.९९** | **३,१५४.६५** | **८५६.०७** | **१,४१९.९१** | **१,६६४.१९** |

## शासन अनुदान व विकास हक्क हस्तांतरण

अनुसूची - ड
(रुपये कोटी)

| अ. क्र. | तपशिल | प्रत्यक्ष | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | सुधारीत अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | | | |
| १ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी अनुदान | १२०.०० | ८०.०० | १२०.०० | ४००.०० | १४०.०० | ४००.०० |
| २ | स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारकासाठी अनुदान | ८०.०० | ११६.२२ | ३३.२६ | १४५.०० | ५०.०० | १२०.५३ |
| ३ | बृहन्मुंबई महानगरपालिके कडून अंशदान (मेट्रो मार्ग ६, पुल), माता रमाबाई आंबेडकर नगर आणि विकास हक्क हस्तांतरण | ३८४.५० | ०.०० | १००.०० | ४७९.०० | ३८४.३६ | १६८.६१ |
| ४ | राज्य शासनाकडून अनुदान - रायगड,पेण ग्रोथ सेंटर | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ५००.०० | ५००.०० |
